SONI TILES Since 1965
AND MARBLE INDUSTRIES
Opp. Munot Estate, Station Road, Ahmednagar. Tel. : (0241) 2418720
Mob. 9372497999
Wholesalers & Manufacturers of - Ceramic Wall & Floor Tiles, Vitrified Tiles, Paving Blocks, Marble & Granite
सोनी टाईल्स अँण्ड मार्बल इंडस्ट्रिज

संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, सोमवार दि. २७.०७.२०२६ | अंक नं. १०० | वर्ष ६८ वे | दैनिक वर्ष ६२ वे | ANR/022/2018-2020

तुमच्या बॉर्न बेबीची काळजी तुमच्याप्रमाणे आम्हालाही
नवजात बाळासाठी सर्व काही इथेच...
आता पुण्यात सुद्धा..
। स्वेटर । जॅकेट । झबले । टोपी । लंगोट । गादी । । मच्छरदाणी । बंडी । कॅप । टॉवेल । कपाट । । प्लास्टिक झायपिंट । सॉक्स । हातमोजे व बरेच काही.
जरीवाला
कापड बाजार, नं. 7666510765
यशोदानगर, पाईपलाईन रोड, अ.नगर
सिंहगड रोड, त्रिमूर्ती हॉस्पिटल जवळ, योगेश मेडिकल शेजारी, पुणे. मो. 7775089505

स्मार्ट असो वा मार्ट..मिल असो वा मॉल...
सर्वात स्वस्त देणार फक्त राजपाल !
खरेदी | खरेदीवर पॉईंट | पॉईंट्सवर गिफ्ट
आला रे आला राजपाल सेल आला..!
30 ते 70% डिस्काउंट सेल
विश्वसनीय वस्त्रांची अखंड परंपरा
राजपाल
संगमनेर (02425) 222226
अहिल्यानगर (0241) 2999299
नारायणगाव (02132) 242132
श्रीरामपूर (02422) 220090

मान्सून मध्ये मिळवा डिस्काउंट UPTO 50%
दररोज पहिल्या 100 महिलांना ₹5000 च्या खरेदीवर चांदीची भेटवस्तू
अहिल्यानगरकर !! साक्षिदार व्हा सर्वात मोठ्या पैठणी आणि साडी महोत्सवाचे
स्थळ : बंधन लॉन्स डि-मार्ट जवळ, सावेडी, अहिल्यानगर
91 452 452 52
सोनाली पैठणी अँड सिल्क साडी (येवला)
23 जुलै ते 2 ऑगस्ट 2026
सकाळी 10 ते रात्री 10 वाजेपर्यंत


92.5% शुद्ध चांदीमधील अप्रतिम दागिन्यांची असंख्य व्हरायटी
लेडिज अंगठी | फॅन्सी टॉप व रिंगा | लेडिज ब्रासलेट | फॅन्सी गंठन व नेकलेस | कडली | घड्याळ
साई मिडास टच, नगर-मनमाड रोड, सावेडी, अहिल्यानगर
9272422001/02
92.50 शुद्ध चांदीपासुन बनविलेले खास आपल्या लाडक्या लहान बालगोपाळांसाठी
चांदीमधील कार्टुन ग्लास, कडली, फुलपात्र, चमचा, ताट, वाटी, बाटली, कडे, पैजण, वाळे, तोडे, मग आणि बरचं काही..

## शहराच्या मध्यवर्ती भागात होतोयं दूषित पाण्याचा पुरवठा

### नागरिकांचे आरोग्य धोक्यात; महानगरपालिकेने तातडीने उपाययोजना करण्याची मागणी

नगर – शहराच्या मध्यवर्ती भागात गंज बाजार, सराफ बाजार परिसरामध्ये पिण्याच्या पाण्याच्या नळावाटे मैला मिश्रित पाण्याचा पुरवठा सुरु असून या पाण्याला मोठ्या प्रमाणावर दुर्गंधी येत आहे. या दुषित पाण्यामुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले असून महापालिका प्रशासनाने याबाबत तातडीने उपाययोजना करण्याची मागणी होत आहे.

गेल्या काही दिवसांपासून शहराच्या मध्यवर्ती भागातील गंज बाजार सराफ बाजार या परिसरामध्ये महापालिकेच्या नळ पाणीपुरवठा योजनेतून पिण्याचे पाणी दूषित येत असून त्यात अळ्याही आढळून येत आहेत. यामुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. खराब पाण्यामुळे अनेक प्रकारच्या आरोग्याच्या समस्या निर्माण होत आहेत. दूषित पाण्यात विषाणू आणि हानिकारक रसायनिक घटक असतात त्यामुळे अतिसार, कॉलरा, टायफाईड, कावीळ यांच्यासारखे आजार होऊ शकतात. पोट दुखी, उलट्या आणि इतर पचन संस्थेचे विकार देखील होऊ शकतात. आतड्यांमध्ये संसर्ग होऊन अतिसार होतो ज्यामुळे शरीरातील पाणी कमी होते आणि निर्जलीकरण होऊ शकतो. कॉलरा एक गंभीर आजार आहे जो दूषित पाण्यामुळे पसरतो आणि त्यात अतिसार आणि उलट्या होतात. निर्जलीकरणामुळे मृत्यूही होऊ शकतो. गंभीर दुष्परिणाम दूषित पाणी पाण्यामुळे नागरिकांच्या जीवावर होऊ शकतो. त्यामुळे सध्याच्या पावसाळ्याच्या दिवसात अहिल्यानगर महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागाने गाफील न राहता तत्काळ या समस्येवर लक्ष केंद्रित करून नागरिकांना स्वच्छ पाणीपुरवठा करावा अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.



महानगरपालिकेकडून गंज बाजार सराफ बाजार परिसरात पुरवठा होणाऱ्या पिण्याच्या पाईपलाईन मधून नागरिकांना दूषित पाणी मिळत आहे. (छाया – धनेश कटारिया)

## आठवड्याच्या पहिल्याच दिवशी भारतीय शेअर बाजारात तेजी

### गुंतवणूकदारांनी काही तासांत कमावले ४ लाख कोटी

मुंबई – भारतीय शेअर बाजाराने आज सलग पाच सत्रांमधील घसरणीची मालिका खंडित केली असून सेन्सेक्स आणि निफ्टी या प्रमुख निर्देशांकांमध्ये मोठी वाढ झाली आहे. इराण आणि अमेरिका यांच्यातील निवळलेला तणाव, कच्च्या तेलाच्या किमतीत झालेली घट आणि इतर सकारात्मक संकेतांमुळे गुंतवणूकदारांमध्ये उत्साह वाढला आहे.

सकाळी ११:०० वा. सेन्सेक्स ६०० हून अधिक अंशांच्या वाढीसह ७६,६९६ या दिवसातील उच्चांकावर पोहोचला, तर निफ्टी ५० मध्ये १५० हून अधिक अंशांची वाढ होऊन तो २३,९०० च्या वर गेला आहे. या जोरदार वाढीमुळे बीएसईवर सूचीबद्ध असलेल्या सर्व कंपन्यांच्या एकूण बाजार भांडवलात जवळपास ४ लाख कोटी रुपयांची भर पडली आणि ते ४७९ लाख कोटी रुपयांवर पोहोचले.

सेन्सेक्सवर तेजीचे नेतृत्व करताना इंडिगो, एटरनल आणि एशियन पेंट्सच्या शेअर्समध्ये ३ टक्क्यांपर्यंत वाढ झाली. त्यापाठोपाठ इन्फोसिस, बजाज फायनान्स, हिंदुस्तान युनिलिव्हर, टेक महिंद्रा, टीसीएस, आयटीसी, टाटा स्टील आणि कोटक महिंद्रा बँकेच्या शेअर्समध्ये १ ते २ टक्क्यांची वाढ दिसून आली. मात्र, या प्रवाहाच्या अगदी उलट, आयसीआयसीआय बँक आणि अल्ट्राटेक सिमेंटचे शेअर्स किरकोळ घसरणीसह तोट्यात व्यवहार करत होते.

प्रमुख निर्देशांकांसह आज व्यापक बाजारातही तेजी दिसून आली. यात 'निफ्टी मिडकॅप १००' आणि 'निफ्टी स्मॉलकॅप १००' या निर्देशांकांनी प्रत्येकी १ टक्क्यांपर्यंत वाढ नोंदवली. दरम्यान, बाजारातील अस्थिरतेचे निदर्शक असलेल्या 'इंडिया VIX' मध्ये सुरुवातीच्या व्यवहारांत ३ टक्क्यांहून अधिक घसरण होऊन तो १३.५५ वर आला, जे गुंतवणूकदारांचा सुधारलेला आत्मविश्वास दर्शवते.

क्षेत्रनिहाय निर्देशांकांपैकी जवळपास सर्वच निर्देशांकांनी सकारात्मक कल दर्शवला. यात 'निफ्टी एफएमसीजी' आणि 'निफ्टी आयटी' यांनी प्रत्येकी १ टक्क्यांहून अधिक वाढ नोंदवत आघाडी घेतली. बाजाराचा एकूण कल जोरदार तेजीचा होता. एनएसईवर २,२२९ शेअर्समध्ये वाढ झाली, तर ४३६ शेअर्समध्ये घसरण झाली आणि ९१ शेअर्सचे भाव स्थिर राहिले.

गेल्या आठवड्यात भारतीय शेअर बाजारात झालेली मोठी घसरण आणि त्यानंतर झालेली 'व्हॅल्यू बाइंग' यामुळे बाजारातील तेजीचा कल अधिक बळकट झाला असावा. गेल्या आठवड्यात बाजारात आलेल्या मोठ्या घसरणीनंतर जिओजित इन्व्हेस्टमेंट्सचे संशोधन प्रमुख विनोद नायर यांनी नमूद केले होते की, कंपन्यांच्या कमाईतील गतीमध्ये मोठी सुधारणा आर्थिक वर्ष २०२७ च्या उत्तरार्धापासूनच अपेक्षित आहे. मात्र ही सुधारणा कच्च्या तेलाच्या किमती स्थिर होणे आणि पश्चिम आशियातील तणाव निवळणे या गोष्टींवर अवलंबून असेल.



देशी गोवंशाला राज्यमाता घोषित केल्यानंतरही गोवंश संरक्षणासाठी प्रभावी उपाययोजना करण्यात याव्यात, या मागणीसाठी गो सन्मान आव्हान अभियानतर्फे जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले.

## गोवंश रक्षणासाठी तीन महिने उलटूनही उपाययोजना होईनात

### 'गो सन्मान आव्हान अभियान'चे जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

नगर – देशी गोवंशाला राज्यमाता घोषित केल्यानंतरही गोवंश संरक्षणासाठी प्रभावी उपाययोजना करण्यात याव्यात, या मागणीसाठी गो सन्मान आव्हान अभियानतर्फे रविवारी संत समाज, गोभक्त आणि नागरिकांनी जिल्हाधिकारी कार्यालयात निवेदन दिले. जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांच्यामार्फत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नावे स्मरणपत्र सादर करण्यात आले.

अभियानाच्या प्रतिनिधींनी सांगितले की, राज्यभर राबविण्यात आलेल्या स्वाक्षरी मोहिमेत सुमारे ३ लाख ५० हजार नागरिकांनी सहभाग नोंदविला होता. या स्वाक्षरी मोहिमेअंतर्गत २७ एप्रिल २०२६ रोजी राज्यातील सर्व तहसील कार्यालयांमार्फत मुख्यमंत्र्यांकडे निवेदन पाठविण्यात आले होते. मात्र, तीन महिने उलटूनही मागण्यांबाबत अपेक्षित कार्यवाही झालेली नसल्याचा दावा आंदोलनकर्त्यांनी केला.

निवेदनात देशी गोवंशाला राष्ट्रमाता दर्जा देण्यासाठी केंद्र सरकारकडे महाराष्ट्र शासनाने शिफारस करावी, प्रत्येक जिल्हा व तालुक्यात बेवारस, वृद्ध आणि आजारी गोवंशासाठी गोपालन केंद्रे, वैद्यकीय उपचार व संरक्षणाची प्रभावी व्यवस्था उभारावी, तसेच जैविक शेती, पंचगव्य उत्पादने आणि गोआधारित अर्थव्यवस्थेला चालना देण्यासाठी स्वतंत्र धोरण व आर्थिक तरतूद करावी, अशा प्रमुख मागण्या करण्यात आल्या आहेत. गोवंश संरक्षणाच्या मागण्यांबाबत शासनाने तातडीने निर्णय घ्यावा. अन्यथा संत समाज आणि गोभक्त राज्यभर तीव्र आंदोलन छेडतील, असा इशाराही या निवेदनातून देण्यात आला आहे. जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी निवेदन स्वीकारून ते शासनापर्यंत पोहोचविण्याचे आश्वासन दिल्याचे आंदोलनकर्त्यांनी सांगितले.

## सोशल मीडियावर धार्मिक भावना दुखावणारी पोस्ट

### दोन समाजात तेढ निर्माण केल्याप्रकरणी दोघांवर गुन्हा दाखल

नगर – भिंगार शहरात सोशल मीडियावर धार्मिक भावना दुखावणारी आणि दोन समाजात तेढ निर्माण करणारी पोस्ट प्रसिद्ध केल्याचा प्रकार समोर आला आहे. या प्रकरणी कॅम्प पोलिसांनी तत्परतेने कारवाई करत दोन तरुणांवर गुन्हा दाखल केला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, भिंगार येथील पंचशील कमानीजवळ २६ जुलै रोजी दुपारी अडीच वाजेच्या सुमारास ही घटना घडली. आरोपी कार्तिक भुतकर आणि शुभम भुजबळ यांनी त्यांच्या इन्स्टाग्राम अकाऊंटवरून निळे कबुतर व हिरवे कबुतर अशा आशयाची पोस्ट टाकली होती. या पोस्टमुळे दोन धर्मांमधील एकोपा बिघडण्याची आणि शांतता धोक्यात येण्याची शक्यता निर्माण झाली होती.

या प्रकरणी भीमनगर, भिंगार येथील रहिवासी सिद्धार्थ कृष्णा आढाव (वय ३३) यांनी भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात तक्रार दिली. त्यांच्या तक्रारीवरून पोलिसांनी आरोपी कार्तिक भुतकर आणि शुभम भुजबळ यांच्याविरोधात भारतीय न्याय संहितेच्या कलम १९६ (१) (अ) प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे.

सहाय्यक पोलीस निरीक्षक तेजश्री थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली भिंगार पोलीस पुढील तपास करत आहेत.

दरम्यान, भिंगार कॅम्पच्या सपोनि. तेजश्री थोरात यांनी सोशल मिडियाच्या माध्यमातून नागरिकांना आवाहन करताना अशा प्रकारच्या प्रवृत्तींनी सोशल मिडियाचा गैरवापर करत अफवा पसरविण्याचा प्रयत्न केल्यास त्यावर विश्वास ठेवू नये. समाजात शांतता राहण्यासाठी सोशल मिडियाचा वापर जबाबदारीने करावे, असे त्या म्हणाल्या.

पाऊल टाका स्टाईलमध्ये!
आमच्याकडे उपलब्ध पादत्राणांचे प्रकार
पुरुषांसाठी पादत्राणे | महिलांसाठी पादत्राणे | मुलांसाठी पादत्राणे
क्रॉक्स (Crocs), क्लॉग्स स्लायडर्स, फ्लिप-फ्लॉप्स, स्नीकर्स, कॅज्युअल शूज, ब्रँडेड पादत्राणे, फॉर्मल शूज, स्पोर्ट्स शूज, फ्लोटर्स, घरातील वापरासाठी चप्पल, बाहेरील वापरासाठी चप्पल व शूज वरांसाठी (ग्रूम) पादत्राणे वधूसाठी (ब्रायडल) पादत्राणे, मोजडी, कोल्हापुरी चप्पल..
खास मान्सून धमाका! ही जाहिरात दाखवा आणि प्रत्येक खरेदीवर मिळवा १०% सूट!
१००% ओरिजनल लेदर आणि कोल्हापुरी चपला
फॅशन आणि मजबुतीचा पत्ता!
Liberty SHOES
लिबर्टी शूज
एम. जी. रोड, कापड बाजार, अहिल्यानगर.
SHOE PALACE
शू पॅलेस
सारडागल्ली, अ.नगर
मो : 9881531536

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
नवा मराठा
फोन–२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. – कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com

# शेतातील शेळ्या हुसकावल्याच्या कारणावरून काठी व गजाने हल्ला; तीन जणांवर गुन्हा दाखल

नगर – नगर तालुक्यातील कामरगाव येथे शेतात बाजरीचे पीक खात असलेल्या शेळ्यांना हाकलून लावल्याचा राग मनात धरून ५० वर्षीय नागरिकाला काठी व लोखंडी गजाने गंभीर मारहाण करण्यात आल्याची घटना घडली आहे. याप्रकरणी तीन जणांविरुद्ध नगर तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, कामरगाव येथील रहिवासी हरिश्चंद्र विनायक साळी (वय ५०) हे १९ जुलै रोजी सकाळी ९.३० वाजताच्या सुमारास घरी जात होते. त्यावेळी गावातीलच आरोपी संगिता विठ्ठल शितोळे, पांडुरंग विठ्ठल शितोळे आणि यश नामदेव खोमणे हे तिघे हातात काठी व लोखंडी गज घेऊन त्यांच्या समोर आले. आमच्या शेळ्यांना दगड का मारला? असा जाब त्यांनी विचारला.

त्यावर, शेळ्या शेतातील बाजरीचे पीक खात असल्याने त्यांना फक्त पळवून लावले, दगड मारला नाही, असे हरिश्चंद्र साळी यांनी सांगितले. या उत्तराचा राग आल्याने तिन्ही आरोपींनी संगनमत करून साळी यांना शिवीगाळ करत काठी आणि लोखंडी गजाने बेदम मारहाण केली व जीवे मारण्याची दमदाटी केली.

मारहाणीत गंभीर जखमी झालेल्या हरिश्चंद्र साळी यांना खाजगी रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले.

उपचारांनंतर त्यांनी दिलेल्या तक्रारीवरून नगर तालुका पोलिसांनी आरोपी संगिता शितोळे, पांडुरंग शितोळे आणि यश खोमणे यांच्याविरोधात भारतीय न्याय संहिता कलम ११८(१), ११५(२), ३५२, ३५१(२), ३५१(३) व ३(५) नुसार गुन्हा दाखल केला आहे. या घटनेचा पुढील तपास पोलीस हवालदार सोमनाथ जायभाय करत आहेत.

# नगरमध्ये मोटारसायकल चोऱ्या करणारा सराईत गुन्हेगार जेरबंद

## स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई, आरोपीकडून ५ मोटार सायकल हस्तगत



मोटारसायकल चोऱ्या करणारा गुन्हेगार जेरबंद केल्यानंतर त्याच्या समवेत स्थानिक गुन्हे शाखेचे पथक.

नगर – नगर शहरातून मोटार सायकल चोरणाऱ्या एका चोरट्यास स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने शिताफीने जेरबंद केले असून, त्याच्याकडून १ लाख ५५ हजार रुपये किमतीच्या एकूण ५ मोटार सायकल हस्तगत करण्यात आल्या आहेत. या कारवाईमुळे अहिल्यानगरसह पुणे जिल्ह्यातील गुन्हे उघडकीस आले आहेत.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, १७ जुलै रोजी सकाळी ११.३० ते दुपारी १ वाजेच्या दरम्यान, वेणुगंगा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस, एकविरा चौक, पाईपलाईन रोड, साईकृपा बिल्डिंग, अहिल्यानगर येथील पार्किंगमध्ये फिर्यादी शशिकांत भाऊसाहेब गलबले (रा. देऊळगाव गलांडे, ता. श्रीगोंदा) यांनी त्यांची मालकीची एच.एफ. डिलक्स मोटार सायकल (क्र. एम.एच. १६. सी.एच. ७५५२) हॅण्डल लॉक करून लावली होती. अज्ञात चोरट्याने ती चोरून नेली. या प्रकरणी फिर्यादीच्या तक्रारी वरून तोफखाना पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता.

सदर गुन्हा गांभीर्याने घेत पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांनी पोलीस अंमलदारांचे एक विशेष पथक तयार केले. या पथकात अरविंद भिंगारदिवे, योगेश भिंगारदिवे, फुरकान शेख, दीपक घाटकर, भीमराज खर्से, प्रमोद जाधव आणि प्रशांत राठोड यांचा समावेश होता.

तांत्रिक विश्लेषण आणि गुप्त बातमीदारांच्या माहितीच्या आधारे, २६ जुलै रोजी पथकाला माहिती मिळाली की, सदर गुन्हा सराईत गुन्हेगार किशोर जयसिंग पठारे (रा. पिंपळगाव माळवी, ता. नगर) याने केला असून तो चोरीच्या मोटार सायकलवरून रामवाडीकडून तारकपूर बस स्टँडकडे येणार आहे. त्यानुसार पथकाने रामवाडी ते तारकपूर बस स्टँडकडे जाणाऱ्या रस्त्यावर सापळा रचून संशयितास ताब्यात घेतले. त्याची झडती व चौकशी केली असता त्याने गुन्ह्याची कबुली दिली.

आरोपीच्या ताब्यातून एकूण १ लाख ५५ हजार रुपये किमतीच्या ५ मोटार सायकल हस्तगत करण्यात आल्या आहेत. सखोल चौकशी केली असता त्याने आणखी गुन्हे केल्याचे उघडकीस आले असून, त्यात तोफखाना पोलीस ठाणे, रांजणगाव पोलीस ठाणे (जि. पुणे) आणि शिरुर पोलीस ठाणे (जि. पुणे) येथील गुन्ह्यांचा समावेश आहे. ताब्यातील आरोपीस पुढील तपासासाठी तोफखाना पोलीस ठाण्यात हजर करण्यात आले असून, या प्रकरणाचा पुढील तपास तोफखाना पोलीस करीत आहेत.

# ड्रग्ज प्रकरणातील मुकुंदनगरचा मुख्य आरोपी अखेर गजाआड

नगर – सावेडी उपनगरातील मिस्किनमळा परिसरातून जप्त केलेल्या मेफेड्रोन (एमडी) प्रकरणातील मुख्य संशयित आरोपीला अटक करण्यात तोफखाना पोलिसांना यश आले आहे. जमीर निसार शेख (रा. मुकुंदनगर) असे अटक केलेल्या संशयित आरोपीचे नाव आहे. त्याला न्यायालयाने तीन दिवसांची (२९ जुलैपर्यंत) पोलीस कोठडी सुनावली आहे. या गुन्ह्यात आणखी काही संशयित पसार असून त्यांचा शोध सुरू असल्याचे पोलिसांनी सांगितले.

१९ जुलै रोजी तोफखाना पोलिसांचे गुन्हे शोध पथक सावेडी परिसरात गस्त घालत असताना मिस्किनमळा येथे एक कार संशयास्पदरीत्या फिरताना आढळली. पोलिसांनी या कारमधील झिशान सय्यद, रेहान शेख आणि वसीम बागवान यांना ताब्यात घेतले. तर, जमीर शेख व त्याचा साथीदार पसार झाला आहे. कारमध्ये सुमारे १५० ग्रॅम मेफेड्रोन, दरोड्याचे साहित्य मिळून आले. तिघांच्या चौकशीत आणखी तिघांची नावे समोर आलेल्या अली शेख, दानिश शेख, कासिफ खान यांनाही अटक करण्यात आली होती. ते सर्व सध्या पोलीस कोठडीत आहेत.

दरम्यान, अटकेतील दानिश शेख याच्या मुकुंदनगर येथील घराची झडती घेतली. त्याच्या घरात आणखी पाच ग्रॅम मेफेड्रोन मिळून आले आहे. तर या गुन्ह्यातील मुख्य सूत्रधार जमीर शेख हा पसार होता. तो मुकुंदनगर भागात येणार असल्याची माहिती पोलीस उपनिरीक्षक योगेश चाहेर यांना मिळाली होती. त्यांनी पथकासह सापळा रचून जमीर शेख याला अटक केली. त्याला न्यायालयाने तीन दिवसांची पोलीस कोठडी दिली आहे. त्यानेच ड्रग्ज विक्रीसाठी अहिल्यानगर शहरात आणले असल्याचा पोलिसांचा संशय असून त्यादृष्टीकोनातून त्याच्याकडे तपास केला जात आहे.



आरणगाव येथील बुवाजी बुवा मंदिरात उपवास सोडताना भाविक.

# बुवाजी बुवा मंदिरात हजारो भाविकांनी सोडला उपवास

नगर – आषाढी एकादशीचा उपवास सोडण्यासाठी द्वादशीला साक्षात पांडुरंग उपवास सोडायला अरणगाव (मेहराबाद) येथील संत बुवाजी बुवा महाराज मंदिरात येतात अशी आख्यायिका आहे. त्यामुळे दिवसभर परिसरातील व नगरमधील सुमारे हजारो भाविकांनी बुवाजी बुवा मंदिरात द्वादशीला उपवास सोडला.

संतांची पावन भूमी असलेल्या नगरजवळील अरणगाव येथे श्री संत बुवाजीबुवा महाराज यांची संजीवन समाधी असलेल्या पुण्यभूमीत आषाढी सप्ताह, अखंड हरीनाम सप्ताह व ज्ञानेश्वरी पारायण सोहळा संपन्न झाला. आषाढी एकादशीची पूजा संपन्न झाली. द्वादशीचा उपवास सोडण्यासाठी सुमारे २७ हजार भाविक आले होते.

द्वादशी महाप्रसादचे अन्नदाते अरणगावचे महेश विठ्ठल गहिले, बाळासाहेब नारायण जाधव, संजय काका भाटी (शिरूर) यांच्यातर्फे भात, आमटी व लापशीचा प्रसाद बनविण्यात आला. दुपारी १२ वाजता सुरु झालेला महाप्रसाद रात्री १० वाजेपर्यंत चालू होता. ट्रस्ट व ग्रामस्थांनी महाप्रसादाचे नियोजन केले होते.

# रेशनिंगच्या तांदळाचा काळाबाजार प्रकरणी संजय अग्रवाल याच्यासह ८ जणांवर मोक्का

नगर – राज्य सरकारच्या अंत्योदय योजनेअंतर्गत गोरगरीब लाभार्थ्यांसाठी मोफत वितरित करण्यात येणाऱ्या रेशनिंगच्या तांदळाच्या कथित काळाबाजार प्रकरणात मोठी घडामोड समोर आली आहे. या प्रकरणात तांदूळ खरेदी केल्याचा आरोप असलेल्या छत्रपती संभाजीनगर येथील गजानन ग्रो कंपनीचे संचालक संजय अग्रवाल यांच्यासह आठ जणांविरुद्ध महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम, १९९९ (मोक्का) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मोक्कातील आरोपी असलेला संजय अग्रवाल याने यापूर्वी नगरच्या स्थानिक गुन्हे शाखेचे तत्कालीन पोलीस उपनिरीक्षक तथा राष्ट्रपती पदकप्राप्त राजेंद्र वाघ यांच्याविरोधात तक्रार केली होती. त्या तक्रारीनंतर वाघ यांच्यावर निलंबनाची कारवाई झाली होती. आता त्याच तक्रारदारावर मोक्का अंतर्गत गुन्हा दाखल झाल्याने या प्रकरणाला नवे वळण मिळाले आहे.

या आरोपींपैकी तिघांना अटक करण्यात आली असून संजय अग्रवाल यांच्यासह पाच आरोपी अद्याप फरार आहेत. जिन्सी पोलीस ठाण्याचे पथक त्यांचा शोध घेत आहे. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील जिन्सी पोलीस ठाण्यात दाखल झालेल्या गुन्ह्यात संदीप विश्वनाथ शिंदे यांनी फिर्याद दिली आहे. तपासात संघटित पद्धतीने शासकीय रेशनिंगचा तांदूळ खरेदी करून त्याची अवैध विक्री होत असल्याचा आरोप करण्यात आला आहे.

या प्रकरणाची पार्श्वभूमी १७ नोव्हेंबर २०२५ रोजीच्या कारवाईशी संबंधित आहे. त्यावेळी अहिल्यानगर स्थानिक गुन्हे शाखेचे तत्कालीन पोलीस निरीक्षक किरणकुमार कबाडी यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक राजेंद्र वाघ, स.पो.नि. अमोल पवार आणि त्यांच्या पथकाने नेवासा तालुक्यातील भानसहिवरे येथे छापा टाकला होता. गुप्त माहितीच्या आधारे करण्यात आलेल्या या कारवाईत शासनाच्या सार्वजनिक वितरण व्यवस्थेतील तांदूळ मोठ्या प्रमाणावर साठवून ठेवण्यात आल्याचे समोर आले होते.

पोलिसांनी गोडाऊनची पाहणी केली असता ५० किलो वजनाच्या तब्बल ४५० तांदळाच्या गोण्या, अंदाजे ११ लाख २५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला होता. पंचनामा करून तांदूळ ताब्यात घेण्यात आला. चौकशीदरम्यान संबंधित तांदळाच्या खरेदी–विक्रीची कोणतीही वैध बिले किंवा कागदपत्रे सादर करण्यात आली नसल्याने जीवनावश्यक वस्तू अधिनियम, १९५५ अंतर्गत गुन्हा नोंदविण्यात आला. तपासादरम्यान हा तांदूळ छत्रपती संभाजीनगर येथील गजानन ग्रो कंपनीचे संचालक संजय अग्रवाल यांच्याकडे विक्रीसाठी पाठविण्यात येत असल्याची माहिती समोर आल्याचा पोलिसांचा दावा आहे. तसेच यापूर्वीही अशाच प्रकारचे व्यवहार झाल्याची माहिती उपलब्ध झाल्याने अग्रवाल यांचे नाव गुन्ह्यात समाविष्ट करण्यात आले होते.

या कारवाईनंतर सुमारे दोन महिन्यांनी संजय अग्रवाल यांनी पोलीस उपनिरीक्षक राजेंद्र वाघ यांच्याविरोधात तक्रार केली. या तक्रारीत खोट्या गुन्ह्यात नाव टाकल्याचा आरोप करण्यात आला होता. त्यानंतर राजेंद्र वाघ यांच्यावर कारवाई झाली. आता मात्र याच संजय अग्रवाल यांच्यासह आठ जणांविरुद्ध मोक्का अंतर्गत गुन्हा दाखल झाल्याने तपासाचे स्वरूप अधिक गंभीर झाले आहे. पोलिसांच्या म्हणण्यानुसार या गुन्ह्यातील तिघांना अटक करण्यात आली असून उर्वरित पाच आरोपी फरार आहेत. त्यांचा शोध घेण्यासाठी विशेष पथके कार्यरत आहेत.

## सुभद्राबाई शिंदे यांचे वृद्धापकाळाने निधन



नगर – नगर–कल्याण रोडवरील सुभद्राबाई लिंबाजी शिंदे (वय ९२) यांचे रविवारी (दि.२६) रोजी वृद्धपकाळाने निधन झाले. धार्मिक व मनमिळावू स्वभावामुळे ते सर्वांना सुपरिचित होत्या.

त्यांच्या पश्चात दोन मुले, मुलगी, सुना, नातवंडे असा परिवार आहे. रविवारी नालेगाव अमरधाम येथे त्यांचे पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. पत्रकार सचिन शिंदे यांच्या त्या आई होत्या.


## हरकचंद संघवी यांचे दु:खद निधन



श्रीरामपूर – नवकार भारत माता चौक, साईश्रद्धा कॉलनी, सिद्धी विनायक मंदिर, मोरगे वस्ती वॉर्ड नं.७ येथील रहिवासी हरकचंद बनेचंद संघवी (वय ८५) यांचे २६ जुलै रोजी दु:खद निधन झाले.

नवीन मराठी शाळे समोरील पुष्पक एजन्सीचे मालक दिपक संघवी यांचे वडील तर झुंबरलाल व ताराचंद संघवी यांचे ते मोठे बंधू होत.

## परशुराम अमृतवाड यांचे वृद्धापकाळाने निधन



नगर – नवघर गल्ली संगमनेर येथील रहिवासी परशुराम धर्माजी अमृतवाड (वय ७४) यांचे २५ जुलै रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर संगमनेर अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे पत्नी, २ मुले, १ मुलगी, सुना, जावई, नातवंडे असा परिवार आहे. श्रीनिवास व सचिन यांचे ते वडील होत.

## चंद्रभान लगड यांचे वृद्धापकाळाने निधन



बीड – हिवरा पिंपरखेड, ता.आष्टी येथील रहिवासी चंद्रभान रामभाऊ लगड (वय ८६) यांचे २६ जुलै रोजी वृद्धापकाळाने दु:खद निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर हिवरा पिपरखेड (ता.आष्टी) स्मशानभूमी येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे १ मुलगा, १ मुलगी, सुन, जावई, नातवंडे असा परिवार आहे. पत्रकार अनिल लगड यांचे ते वडील होत. बीड जिल्हा सहकारी बँकेचे ते शाखा व्यवस्थापक म्हणून सेवानिवृत्त झाले होते.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, २७२३, गंजबाजार, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

# माळीवाडा बसस्थानकात जुन्या वादातून वॉचमनवर चाकूने हल्ला

नगर – शहरातील माळीवाडा बसस्थानक परिसरात क्षुल्लक कारणावरून वॉचमनवर चाकूने हल्ला करण्यात आल्याची घटना २६ जुलै रोजी सायंकाळी घडली. या हल्ल्यात वॉचमन गंभीर जखमी झाला असून त्याच्यावर जिल्हा रुग्णालयात उपचार सुरू आहेत. या प्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, इंदिरा नगर येथील रहिवासी गौतम हिरामन खरात हे वॉचमन म्हणून काम करतात. २६ जुलै रोजी रात्री पावणेआठच्या सुमारास ते माळीवाडा बसस्थानक परिसरातून जात असताना चंदा नावाच्या व्यक्तीने त्यांना अडवले. आरोपीने त्यांना विनाकारण शिवीगाळ करण्यास सुरुवात केली. वाद वाढल्याने आरोपीने खिशातून चाकू काढून गौतम यांच्या उजव्या गालावर जोरदार वार केला.चाकूचा वार बसल्याने गौतम खरात हे रक्ताच्या थारोळ्यात खाली कोसळले. त्यांना जीवे मारण्याची धमकी देऊन आरोपी घटनास्थळावरून पसार झाला. आसपासच्या लोकांनी जखमीला तातडीने जिल्हा रुग्णालयात दाखल केले.

घटनेची माहिती मिळताच कोतवाली पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक नितीन देशमुख आणि महिला सहाय्यक पोलीस निरीक्षक पूनम श्रीवास्तव यांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. या प्रकरणी पीडित गौतम खरात यांच्या तक्रारीवरून पोलिसांनी आरोपी चंदा याच्याविरुद्ध गुन्हा नोंदवला आहे.

# दारू पिण्यासाठी पैसे न दिल्याने तरुणावर चाकूने प्राणघातक हल्ला

नगर – दारू पिण्यासाठी पैसे देण्यास नकार दिल्याने एका मजुरावर चाकूने हल्ला करून जीवे मारण्याची धमकी दिल्याचा धक्कादायक प्रकार नगर शहरातील माळीवाडा परिसरात घडला आहे. याप्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात संशयित आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत तुषार सुदाम उमाप (वय ३१, रा. गाझी नगर, अहिल्यानगर) यांनी फिर्याद दिली आहे. फिर्यादी हे २६ जुलै रोजी रात्री आठ वाजेच्या सुमारास माळीवाडा येथील जिल्हा परिषद इमारतीसमोरून जात होते. यावेळी संशयित आरोपी रवि उत्तम साठे (रा. भूषणनगर, केडगाव) याने उमाप यांना रस्त्यात अडवून दारू पिण्यासाठी पैशांची मागणी केली.

फिर्यादी तुषार उमाप यांनी दारूसाठी पैसे देण्यास स्पष्ट नकार दिला. याचा राग आल्याने आरोपी रवि साठे याने उमाप यांना अर्वाच्च भाषेत शिवीगाळ करत लाथाबुक्क्यांनी मारहाण करण्यास सुरुवात केली. त्यानंतर आरोपीने स्वतःजवळील चाकू काढून उमाप यांच्या हातावर वार करून त्यांना दुखापत केली आणि जीवे मारण्याची धमकी देऊन तेथून पळ काढला. घटनेनंतर जखमी तुषार उमाप यांनी तात्काळ कोतवाली पोलीस ठाणे गाठून घडलेल्या प्रकाराची तक्रार दिली. पोलिसांनी जखमीला उपचारासाठी जिल्हा रुग्णालयात दाखल केले. उमाप यांच्या जबाबावरून कोतवाली पोलिसांनी आरोपी रवि उत्तम साठे याच्याविरोधात गुन्हा दाखल केला आहे.

# पद्मशाली समाजाचा बागुलू पंडुगू उत्सव ३१ जुलै रोजी साजरा होणार

नगर – पद्मशाली समाजाचा पारंपरिक बागुलू पंडुगू यंदा ३१ जुलै रोजी मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येणार असल्याची माहिती अहिल्यानगर पद्मशाली वधू–वर मंडळाचे अध्यक्ष ऋषिकेश गुंडला यांनी दिली. आषाढ शुद्ध पौर्णिमेनंतर येणाऱ्या शुक्रवारी हा सण साजरा करण्याची परंपरा असून, धार्मिक श्रद्धा, आरोग्य, पर्यावरण संवर्धन आणि सामाजिक ऐक्य यांचा संगम या उत्सवातून अनुभवायला मिळतो.

यादिवशी शितळादेवी (पोशम्मा तल्ली) आणि लक्ष्मीमाता (लचमम्मा तल्ली) यांची विधिवत पूजा–अर्चना केली जाते. लक्ष्मीमातेची पारंपरिक जत्राही भरते. शितळादेवी आणि लक्ष्मीआई यांना नैवेद्य अर्पण करून समाजाच्या आरोग्यासाठी, रोगराईपासून संरक्षणासाठी तसेच सुख–समृद्धीसाठी प्रार्थना करण्याची परंपरा अनेक वर्षांपासून जपली जात आहे. बागुलू पंडुगू हा सण पद्मशाली समाजात मोठ्या श्रद्धा आणि उत्साहात साजरा केला जातो. समाजातील प्रत्येक कुटुंबात गोड पुरी, मेथीची भाजी यांसह पारंपरिक नैवेद्य तयार करून देवीला अर्पण केला जातो. त्यानंतर पोतराजांसह पारंपरिक मिरवणूक काढण्यात येते. ही मिरवणूक तोफखाना येथील शितळादेवी मंदिर तसेच बालिकाश्रम रोडवरील जाधव मळ्यातील लक्ष्मीदेवी मंदिरात पोहोचते. दोन्ही ठिकाणी विधिवत पूजा–अर्चना होत असून मोठी यात्रा भरते. या सणामागे धार्मिकतेबरोबरच सामाजिक आणि पर्यावरणीय संदेशही दडलेला आहे. संतुलित पर्जन्यवृष्टी व्हावी, दुष्काळ किंवा अतिवृष्टीचे संकट टळावे, शेती समृद्ध राहावी, निसर्गाचे संवर्धन व्हावे आणि समाजात सुख–समृद्धी नांदावी, अशी प्रार्थना यावेळी केली जाते. यंदाच्या बागुलू पंडुगूच्या निमित्ताने प्रत्येक कुटुंबाने घरटी किमान एक रोप लावून पर्यावरण संवर्धनाचा संकल्प करावा, असे आवाहन ऋषिकेश गुंडला यांनी केले आहे.

शितळादेवीला थंड पदार्थांचा नैवेद्य अर्पण करण्याची परंपरा आहे. दही, हळद टाकलेला भात, गोड पुरी, मेथीची भाजी, लिंबाची पाने, फुटाणे, नारळ, ओवा आणि थंड पाणी यांचा नैवेद्यात समावेश असतो. महिलावर्ग डोक्यावर थंड पाण्याचे कलश घेऊन वाजत–गाजत मिरवणूक काढतो. कलशामध्ये लिंबाच्या पानांच्या डहाळ्या ठेवण्यात येतात. मिरवणूक गावाबाहेरील पोशम्मा आणि लचमम्मा देवीच्या मंदिरात पोहोचल्यानंतर कलशाची स्थापना करून पूजा–अर्चना व नैवेद्याचा कार्यक्रम पार पडतो.

संपूर्ण महाराष्ट्रात बागुलू पंडुगू साजरा होत असला तरी अहिल्यानगर शहरातील हा उत्सव विशेष प्रसिद्ध मानला जातो. या सणासाठी बाहेरगावाहून अनेक समाजबांधव आणि पाहुणे अहिल्यानगरमध्ये येतात. त्यामुळे तोफखाना येथील शितळादेवी मंदिर आणि बालिकाश्रम रोडवरील लचमम्मा (लक्ष्मीदेवी) मंदिर परिसरात दिवसभर यात्रेचे, धार्मिक कार्यक्रमांचे आणि भक्तिमय वातावरणाचे दर्शन घडते.

यानिमित्त ऋषिकेश गुंडला यांनी सर्व पद्मशाली समाजबांधव आणि नागरिकांना बागुलू पंडुगूच्या शुभेच्छा देत हा सण पारंपरिक, पर्यावरणपूरक आणि सामाजिक ऐक्याच्या भावनेतून साजरा करण्याचे आवाहन केले.

# सावेडीतील श्री स्वामी समर्थ मंदिरात गुरुपौर्णिमा उत्सवाला प्रारंभ; २९ जुलैला होणार दर्शन सोहळा

नगर – सावेडी उपनगरातील गुलमोहर रोडवरील श्री स्वामी समर्थ मंदिरात गुरुपौर्णिमा उत्सवाला प्रारंभ झाला असून, या पारायण सोहळ्यास महिलांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला. दि. २६, २७ आणि २८ जुलैदरम्यान दररोज दुपारी १ ते ४ या वेळेत सामुदायिक गुरु लीलामृत पारायणाचे आयोजन करण्यात आले आहे.

२६ जुलै रोजी निखिल देवरे यांच्या उपस्थितीत सामुदायिक गुरु लीलामृत पारायण सोहळ्यास प्रारंभ झाला. यावेळी ते म्हणाले, श्री गुरुचरित्र आणि श्री गुरु लीलामृत हे दत्त संप्रदायातील अत्यंत पवित्र, दिव्य आणि चमत्कारिक ग्रंथ असून, या ग्रंथांचे श्रद्धापूर्वक पठण, चिंतन आणि मनन केल्याने भक्तांना संकट निवारणासह मानसिक व शारीरिक व्याधींमधून दिलासा मिळतो. तसेच चित्त स्थिर होऊन आत्मिक शांततेचा लाभ होतो.

गुरुपौर्णिमेनिमित्त २९ जुलै रोजी श्री स्वामी समर्थ महाराजांच्या दिव्य वस्तूंचा दर्शन सोहळाही आयोजित करण्यात आला आहे. यावेळी महाराजांच्या वापरातील दिव्यमणी, गळ्यातील माळ, पादुका, कानातील व गळ्यातील रुद्राक्ष, नित्य पूजेतील दिव्य शिवलिंग, अन्नपूर्णा माता शंख, रिद्धी–सिद्धी कवड्या, महाराजांनी वापरलेली कस्तुरी उटी, दिव्य वाचनातील गुरुचरित्र ग्रंथ तसेच दत्त महाराजांचा पवित्र शंख आदी दिव्य वस्तूंचे दर्शन भाविकांना घेता येणार आहे. गुरुपौर्णिमेच्या दिवशी सकाळी १० ते रात्री ९ वाजेपर्यंत हा दर्शन सोहळा खुला राहणार असून, भाविकांनी या पर्वणीचा लाभ घ्यावा, असे आवाहन श्री स्वामी समर्थ मंदिराच्या वतीने करण्यात आले आहे.



गुरुपौर्णिमा उत्सवानिमित्त सामुदायिक गुरु लीलामृत पारायण सोहळ्यास श्री स्वामी समर्थ मंदिरात प्रारंभ झाला. (छाया – विजय मते)

# गृहिणी

## आरोग्य

### जिना चढणे ठरेल 'सुपरव्यायाम'

लिफ्ट टाळून जिना चढणे हा दिसायला साधा वाटणारा पण आरोग्यासाठी अमृतासारखा व्यायाम आहे. आधुनिक जीवनशैलीत आपण सोयीसाठी लिफ्ट वापरतो, पण शरीरासाठी जिना चढणे हाच 'सुपरव्यायाम' मानला जातो.जिना चढल्याने हृदयाची गती वाढते, रक्ताभिसरण सुधारते आणि फुप्फुसांची क्षमता वाढते. यामुळे वजन कमी करण्यास मदत होते, कारण यात कॅलरीज जास्त जळतात. पायांचे स्नायू मजबूत होतात तर हाडांची घनता वाढते. मधुमेह आणि उच्च रक्तदाबासारख्या आजारांचा धोका कमी होतो. जिना चढण्याने चयापचय वेगवान होतो, शरीरातील चरबी कमी होते आणि स्टॅमिना वाढतो. सकाळी १० मिनिटे जिना चढल्याने दिवसभर उत्साह टिकून राहतो. यामुळे तणाव कमी होतो आणि झोप चांगली लागते. हृदयविकार आणि स्ट्रोकचा धोका टळतो. जिना चढणे हा कोणत्याही जिमशिवाय करता येणारा मोफत व्यायाम आहे. ऑफिस, शाळा किंवा घरात सहज करता येतो. वय वाढल्यावरही शरीर तंदुरुस्त ठेवण्यासाठी हा उत्तम मार्ग आहे. गुडघे आणि सांधे मजबूत होतात. स्मरणशक्ती आणि एकाग्रता वाढते. लिफ्टऐवजी जिना निवडणे म्हणजे महागड्या फिटनेसपेक्षा सोपा आणि प्रभावी पर्याय आहे. रोज फक्त २-३ मजले जिना चढल्यानेही मोठा फरक पडतो. म्हणून आजपासूनच संकल्प करा - लिफ्ट नको, जिना हवा कारण आरोग्याची खरी गुरुकिल्ली आपल्याच पायात आहे.

## पाककला

### टेस्टी खाजा

**साहित्य :** मैदा २ वाटी, रवा २ चमचे, तूप ३ चमचे मोहनसाठी, चिमूटभर मीठ, पाणी आवश्यकतेनुसार, तळण्यासाठी तेल, पाकासाठी साखर २ वाटी, पाणी १ वाटी, वेलची पूड १/२ चमचा, लिंबाचा रस ४-५ थेंब

**कृती :** एका परातीत मैदा, रवा, मीठ आणि मोहनचे तूप घालून घट्ट भिजवून घ्या. १५ मिनिटे झाकून ठेवा. नंतर त्याचे छोटे गोळे करून लांबट पातळ लाट्या लाटून घ्या. काट्याने त्यावर टोचे मारून घ्या. कढईत तेल गरम करून मंद आचेवर खाजे तळून घ्या. सोनेरी आणि खरपूस होईपर्यंत तळा. दुसऱ्या बाजूला एकतारी पाक बनवून घ्या. त्यासाठी साखर आणि पाणी उकळा. त्यात वेलची पूड आणि लिंबाचा रस घाला. तळलेले खाजे गरम असतानाच पाकात २-३ मिनिटे बुडवून काढा. जाळीवर ठेवून जास्तीचा पाक निथळू द्या. थंड झाल्यावर हवाबंद डब्यात ठेवा. चहासोबत किंवा सणासुदीला खाण्यासाठी खुसखुशीत खाजा तयार आहे.

## वास्तू

### वायव्य कोपऱ्यात काय ठेवू नये?

* वायव्य दिशा पाहुणे, अविवाहित मुली आणि प्रवासाशी संबंधित आहे. म्हणून या कोपऱ्यात पाहुण्यांची खोली, हलके सोफे किंवा फक्त मोकळी जागा ठेवणे सर्वात उत्तम असते. जर जागा रिकामी ठेवणे शक्य नसेल तर तिथे हलके फर्निचर, मातीचा पाण्याचा माठ किंवा पातळ पडदे लावेत.

* भिंतीला पांढरा किंवा फिकट निळा रंग दिल्याने आणि धातूची विंडचाईम लावल्याने वायू तत्व संतुलित राहते.

## सौंदर्य

थंडीमध्ये केस धुतल्यानंतर तेल लावणेही महत्त्वाचे आहे. नारळ तेल किंवा बदाम तेल कोमट करून टाळूला लावल्याने आर्द्रता टिकून राहते. आणि झोपण्यापूर्वी केस मोकळे सोडा किंवा सैलसर वेणी घाला.

## सल्ला

भाजलेल्या शेंगदाण्याचा कूट. बटाट्याची भाजी, मेथीची भाजी किंवा चटणीमध्ये वरून शेंगदाणा कूट टाकला की कुरकुरीतपणा आणि चव दोन्ही वाढते.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

# दैनिक पंचांग

मंगळवार, दि. २८ जुलै २०२६

**---, शके १९४८ पराभवनामसंवत्सर, आषाढ शुक्लपक्ष, पू.षा.१३।११, सूर्योदय ०६ वा. ३१ मि. सूर्यास्त ०६ वा. ४ मि.**

## राशिभविष्य

**मेष :** आज ऊर्जा जास्त राहील. कामात नवीन संधी दिसतील.

**वृषभ :** स्थिरता राहील. पैशासंदर्भात निर्णय घेता येतील. मित्रांसोबत भेट होण्याची शक्यता.

**मिथुन :** विचारांमध्ये गती असेल. लेखन, बोलणे यातून कामे होतील. प्रवासाचे योग. मन चंचल राहू शकते.

**कर्क :** भावनिक दिवस. घरगुती विषयांवर चर्चा होईल. खर्चावर लक्ष जाईल. जुन्या आठवणी समोर येतील.

**सिंह :** मान-सन्मान वाढेल. नेतृत्व करण्याची संधी मिळेल. कामात गती राहील. सामाजिक संबंध सुधारतील.

**कन्या :** कामात बारकावे दिसतील. नियोजनाने कामे पूर्ण होतील. आरोग्याकडे लक्ष राहील.

**तूळ :** समतोल राहील. भागीदारीतून फायदा. खरेदी-विक्रीचे योग.

**वृश्चिक :** गुप्त गोष्टी समोर येतील. संशोधन, अभ्यासासाठी वेळ चांगला. कलात्मक कामात रस वाढेल.

**धनु :** लक्ष्यावर लक्ष राहील. प्रवास किंवा शिक्षणाचे योग. मित्रांची मदत मिळेल. आशावादी राहाल.


**मकर :** कार्यक्षेत्रात जबाबदारी वाढेल. वरिष्ठांकडून कौतुक. दीर्घकालीन योजना आखाल. शिस्त महत्वाची राहील.

**कुंभ :** नवीन कल्पना सुचतील. तंत्रज्ञानाशी संबंधित कामे होतील. सामाजिक कार्यात सहभाग.

**मीन :** स्वप्नाळू दिवस. सर्जनशीलतेला वाव. अध्यात्माकडे ओढ. भावनिक निर्णय होऊ शकतात.

## शब्दगंध क्र. ७४८२


सौ.शैलजा कुलकर्णी



**आडवे शब्द :-** १) रात्री फिरणारे; राक्षस; पिशाच ६) आटोका; ताकत; हाताची वेंध ७) गुजरातमधील एक नदी ९) दणकट; कणखर; मजबूत ११) सहाची पाढ्यातील संज्ञा १२) फिकीर; पर्वा १४) लवकर; जलदी १७) देव, ईश्वर (अरबी भाषेत) १९) एक पांढरा चकचकीत दगड २०) इंग्रजी डिंक तर हिंदी किंवा उर्दूत दुःख २१) वडिलांचा भाऊ; चुलता २२) दडपण; वजन; दबाव २३) फळातील रसाळ भाग; गर २४) एक धान्य

**उभे शब्द :-** १) देखरेख २) छावा; बच्चा ३) धरती; पृथ्वी; वसुधा ४) काडीमोड; सोडचिठ्ठी; घटस्फोट ५) खूण; चिन्ह ८) एक प्रवासी वाहन १०) एक प्रकारची घोडागाडी १३) चोप; ताडन १४) झाक; झुळूक; चकचकीत; चकचकीतपणा १५) आपला नव्हे तो; दुसरा १६) पदार्थाचा उडालेला तुकडा १८) आपल्या व विरुद्ध पक्षाची तुलना १९) दोन नद्यांचे मीलन; जुन्या काळातील एक हिंदी चित्रपट २२) फिर्याद; शत्रुत्व; दुष्मनी; हक्क

### शब्दगंध क्र. ७४८१ चे उत्तर



# * * * * * * मुलांचे विश्व * * * * * *

**सुविचार :** उद्याची चिंता करू नका, आजचं काम मनापासून करा.

## मुलांसाठी भन्नाट माहिती ज्ञानरंजन

### ढग कशापासून बनतात आणि ते आकाशात कसे तरंगतात?

लहानपणापासून आपण सगळ्यांनी आकाशाकडे बघून प्रश्न विचारला असेल - हे ढग कुठून आले?. कधी ते कापसासारखे पांढरे असतात, कधी काळे सावटासारखे, तर कधी संध्याकाळी लाल-नारंगी रंगाने नटलेले. पण विज्ञान सांगते की ढग म्हणजे आकाशात तरंगणारे पाणी आहे. ढग बनण्याची प्रक्रिया - १ ते ४ सर्वात पहिली गोष्ट म्हणजे बाष्पीभवन. सूर्याची उष्णता समुद्र, नदी, तलाव आणि अगदी झाडांच्या पानांमधील पाण्याला गरम करते. त्यामुळे पाण्याचे रूपांतर अदृश्य वाफेत होते. ही वाफ हलकी असल्याने ती हळूहळू वर जाऊ लागते. दुसरी पायरी म्हणजे थंड होणे. जसजशी वाफ वर जाते तसतसे हवेचे तापमान कमी होत जाते. साधारण प्रत्येक १ किलोमीटर उंचीवर ६.५ अंश सेल्सिअसने तापमान कमी होते. तिसरी पायरी म्हणजे संघनन. थंड झाल्यावर वाफेचे पुन्हा पाण्याच्या सूक्ष्म थेंबांमध्ये रूपांतर होते. पण हे थेंब एकटे तयार होऊ शकत नाहीत. त्यांना आधारासाठी हवेतील धूळ, धूर, समुद्रातील मीठाचे कण लागतात. यांनाच संघनन केंद्रक म्हणतात. चौथी पायरी म्हणजे एकत्रीकरण. असे लाखो-करोडो सूक्ष्म थेंब एकत्र आल्यावर आपल्याला दिसणारा मोठा ढग तयार होतो.ढगांचे प्रकार - ५ ते ८ वैज्ञानिकांनी ढगांचे उंचीनुसार ३ मुख्य गट केले आहेत. उंचीवरील ढग - ६ ते १२ किमी उंचीवर. हे पातळ, पिसांसारखे दिसतात. यांना सिरस ढग म्हणतात. यात बर्फाचे स्फटिक असतात.मधल्या उंचीचे ढग - २ ते ६ किमी. हे पांढरे किंवा राखाडी आणि जाड असतात. यांना अल्टो ढग म्हणतात. खालचे ढग - जमिनीपासून २ किमी पर्यंत. हे सर्वात दाट आणि काळे असतात. यांनाच निंबस ढग म्हणतात. यांच्यापासूनच पाऊस, बर्फ पडतो.याशिवाय क्युम्युलस ढग म्हणजे कापसाच्या मोठ्या गाठीसारखे दिसणारे ढग. उन्हाळ्यात हे खूप दिसतात. ढग आकाशात तरंगतात कसे? - ९ ते ११ ढगांचे वजन टनांनी असते तरी ते पडत नाहीत कारण त्यातील प्रत्येक थेंब खूप लहान असतो. तो थेंब हवेतील वर जाणाऱ्या वाऱ्यावर तरंगत असतो. जेव्हा हजारो थेंब एकत्र येऊन जड होतात तेव्हाच ते पाऊस म्हणून खाली पडतात.

ढगांचे महत्त्व - १२ ते १५ ढग फक्त पाऊसच आणत नाहीत. ते पृथ्वीचे तापमान नियंत्रित करतात. दिवसा सूर्याची उष्णता परत अंतराळात पाठवतात आणि रात्री पृथ्वीची उष्णता आत रोखून धरतात. त्यामुळे हवामान संतुलित राहते. शेतकऱ्यांसाठी, नद्यांसाठी आणि पिण्याच्या पाण्यासाठी ढग हेच मुख्य स्त्रोत आहेत.थोडक्यात सांगायचे तर, ढग = सूर्याची उष्णता + पाणी + थंड हवा + धुळीचे कण. हा निसर्गाचा एक अद्भुत सायकल आहे. समुद्रातून वर गेलेले पाणी ढग बनून परत पावसाच्या रूपात आपल्याकडे येते.म्हणूनच पुढच्या वेळी आकाशात ढग दिसले की समजून जा, ते फक्त ढग नाहीत. ते आपल्यासाठी घेऊन येणारा पाण्याचा प्रवास आहे.


## चोर पोलिस

एका छोट्या गावात राघव नावाचा एक प्रामाणिक पोलीस शिपाई राहत होता. तो रोज पहाटे उठून गावात गस्त घालायचा. गावातील लोक त्याच्यावर खूप विश्वास ठेवत. त्याच गावात सोनू नावाचा एक हुशार पण आळशी चोरही राहत होता. मेहनत न करता पटकन श्रीमंत व्हायचे हे त्याचे स्वप्न होते. एकदा गावात मोठी जत्रा भरली. सगळे लोक खरेदी करण्यात आणि मजा करण्यात गुंग होते. याच संधीचा फायदा घेऊन सोनूने सावकाराच्या दुकानातून सोन्याची थैली चोरली आणि पळ काढला. आरडाओरडा ऐकून राघव तिथे पोहोचला. त्याने लोकांना शांत केले आणि चोर कोणत्या दिशेने पळाला हे ठसे बघून ओळखले. सोनूने वाटेत खूप चलाखी केली. तो नदीतून चालला जेणेकरून पायाचे ठसे मिटतील. मग एका शेतात लपला आणि थैली एका कुंडीत पुरली. त्याला वाटले आता पोलीस त्याला कधीच शोधू शकणार नाही. पण राघवाने हार मानली नाही. त्याने गावकऱ्यांना विचारले जत्रेत कोण घाईघाईने पळताना दिसले? एका मुलाने सांगितले काका, एक माणूस नदीकडे पळत गेला आणि त्याच्या हातात काळी थैली होती. राघव नदीच्या काठावर गेला. तिथे ओले पायाचे ठसे होते जे शेताकडे जात होते. शेतात गेल्यावर त्याला ताजी खणलेली माती दिसली. त्याने तिथे खोदले आणि सोन्याची थैली मिळाली. तेवढ्यात सोनू लपून बघत होता. राघवाने त्याला रंगेहात पकडले.

पोलीस स्टेशनमध्ये सोनू रडायला लागला आणि म्हणाला साहेब मला माफ करा. मला वाटले चोरी करून श्रीमंत होईन. पण आज कळले की भीतीने जगण्यापेक्षा मेहनतीने जगणे बरे. राघवाने त्याला कठोर शिक्षा न देता गावातील शाळेत शिपायाची नोकरी लावून दिली.

अर्थ : खोट्या मार्गाने आलेला पैसा शेवटी आपल्यालाच अडचणीत आणतो.

## आत्मशक्ति



### दु:ख पाहणे

मरण पावला होता. तिने मृत बाळाला आपल्या बाहुपाशांत घेतले होते व त्या बाळाला जीवंत करावे अशी ती गौतम बुध्दांना विनंती करू लागली. भगवान गौतम बुध्दांनी सांगितले की ही गोष्ट अशक्य आहे. आयुष्य हे क्षणभंगुर असते व केव्हा ना केव्हा ते संपायचे असते असे समजावून सांगितले. पण ती हट्टी स्त्री काही केल्या ऐकेना. काही तरी चमत्कार करा व बाळाला जीवंत करा! असे ती म्हणू लागली.

शेवटी गौतम बुध्दांनी म्हटले, 'ठीक आहे, बाळाला मी जीवंत करतो पण एका अटीवर....' 'कोणत्या अटीवर ?' स्त्रीने विचारले. गौतमांनी सांगितले, 'ज्या परांत कोणाचाही मृत्यु झाला नाही, अशा घरांतून मोहरीचे बी घेऊन ये.'

हे काम तर अगदी सोपे आहे. असा विचार करून ती स्त्री मोहरीच्या बियांच्या शोधासाठी बाहेर पडली. प्रथम एका घरी गेली. दारावर थाप दिली. दार उघडणाऱ्या जोडप्याने विचारले, 'आम्ही आपणासाठी काय करु शकतो?' त्या स्त्रीने म्हटले, 'आताच थोड्या वेळापूर्वी माझा मुलगा मरण पावला. त्याला जीवंत करण्याचे आश्वासन गौतम बुध्दांनी दिले आहे. पण त्यासाठी अट आहे की ज्या घरातील माणसांनी ह्यापूर्वी मृत्यु पाहिला नाही अशा घरातून मोहरीचे बी आणावयास सांगितले आहे.'

त्या परातील स्त्रीने त्या स्त्रीला सहानुभूती दाखविली. पण दुःखी मनाने सांगितले, 'काही आठवड्यापूर्वीच आमचे वडिल दिवंगत झाले आहेत. आमचे पीकही खराब झाले आहे. आमच्याजवळ तर आमच्या मुलाबाळांच्या संगोपनासाठी पुरेसे पैसे नाहीत. आपणावर गुजरलेल्या संकटाबद्दल आम्हाला फार वाईट वाटते पण आपण चुकीच्या घरी आला आहात!'

त्या घरातील माणसांचे आभार मानून ती स्त्री पुढच्या घरी गेली. त्यानंतर तिसऱ्या आणि पुन्हा वेगळ्या अशा तऱ्हेने तिने सारा दिवस घालविला. पण त्या परिसरातील सर्व घरातील कुटुंबियांनी काही ना काही दुःखे पाहिल्याचे तिला आढळले. दुःख न पाहिलेले एकही दार तिला मिळाले नाही.

(क्रमश:)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

## चिरंतन प्रेमाकडे वाटचाल (नाती घट्ट विणू या)

### मुलांची अस्वस्थता

सुरेश ओबेरॉय : सगळ्यातलं उत्तम शिक्षण, कपडे, इ. शिवानीदीदी : पण त्यांना मुलांना हे सगळं का द्यायचं आहे?

सुरेश ओबेरॉय : ती आनंदी व्हावीत म्हणून.

शिवानीदीदी : आपण असा विचार करतो की, जर आपण मुलांना उत्तम शिक्षण, कपडे आणि सुखसोयी दिल्या तर ते आनंदी होतील. जर आपण मुलांना गरजेचं सगळं दिलं पण नकारात्मक ऊर्जाक्षेत्र घेऊन घरात प्रवेश केला तर मुलं आनंदी होतील का? सुरेश ओबेरॉय नाही.

शिवानीदीदी : आजकाल बहुतांश पालक मुलांबद्दल तक्रार करताना दिसतात. मुलं मनाने कमकुवत आहेत, मोठ्यांचं ऐकत नाहीत, उलटं बोलतात, खूप लवकर दुखावली जातात, चिडतात आणि निराश होतात. अनेक मुलांना लहान वयातच रक्तदाबाचा (ब्लड प्रेशर) त्रास असतो. काही तर आत्महत्याही करतात. हा आनंदी असण्याचा परिणाम आहे का? मुलांच्या आनंदाचा आलेख उंचावण्यासाठी आपण त्यांना जास्तीतजास्त सुखसोयी देतो. पण मग त्यांची सहनशक्ती एवढी कमी का आहे? त्यांच्यावर इतका ताण का आहे? खरं तर तणाव, अस्वस्थता असे शब्द मुलांच्या बाबतीत वापरायची वेळ यायला नको.

तुम्ही जर पालकांना विचारलं, आजकाल मुल खूप तणावाखाली का असतात? तर ते शाळा, परीक्षा आणि स्पर्धेला दोष देतात. पण आपल्या पिढीनेसुद्धा अशा प्रकारच्या अव्हानांना तोंड दिलं आहे. आपल्याकडे तर एवढ्या सुखसोयी आणि नवं तंत्रज्ञान यातलं काहीच नव्हतं. त्या काळी ते सोपं नव्हतं पण आपण कधीच तणावाखाली किंवा निराश नसायचो.

सुरेश ओबेरोय आपण पुस्तकंही एकमेकांची वापरायचो.

शिवानीदीदी : आपण शाळेत चालत किंवा सायरकलवर जायचो. आज मुलं एअर कंडिशन्ड घरातून बाहेर पडतात आणि एअर कंडिशन्ड बस किंवा गाडीतून एअर कंडिशन्ड शाळेत जातात. आज प्रचंड सुखसोयी आहेत आणि परीक्षा पद्धतीपण खूप बदलली आहे. खरं तर ताणतणाव कमी आहेत. आजकाल प्रत्येक परीक्षा झाल्यानंतर पुढच्या तयारीसाठी दोनचार दिवसांचा वेळ दिला जातो. जेव्हा मी माझी दहावीची आय.सी.एस.सी. बोर्डाची परीक्षा दिली तेव्हा ती सोमवार ते शुक्रवार अशी सलग पाच दिवस होती. त्यात एकूण दहा विषयांच्या मी परीक्षा दिल्या.

(क्रमश:)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

* चंद्रप्रकाश या शब्दाचा समास कोणता?

- तत्पुरुष समास

**- अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

## आहारवेद - आरोग्य संवर्धन

### वांगी

सपूर्ण जगामध्ये सर्वात आवडती भाजी म्हणून बांगी जास्त प्रमाणात खाल्ली जातात. विवाहसमारंभ, डोहाळेजेवण, बारसे त्याचबरोबर पाहुण्यांचे स्वागत करण्यासाठी बऱ्याच वेळेला भरली वांगी ही भाजी केली जाते. वांग्याचे भरीत, भाजी, रस्साभाजी, भरली वांगी, वांगी पुलाव, भजी, काप, बांगे पोहे अशा विविध पाककृती बांग्यापासून केल्या जातात. आहारशास्त्राबरोबरच आयुर्वेदशास्त्रातही वांग्याचे महत्त्व विशद केले आहे. साठी बागे हिंदीमध्ये बैंगन' संस्कृतमध्ये 'वर्ताक' इंग्रजीमध्ये 'ब्रिजल', तर शास्त्रीय भाषेमध्ये 'सोलॅनम मॅलॅनजेना' या नावाने ओळखली जाणारी वांगी 'सोलॅनसी' कुळातील आहे. फार प्राचीन काळापासून बांगे या फळभाजीची लागवड भारतात केली जाते. ते मूळचे भारतातीलच आहे. साधारणतः तेराव्या शतकात त्याची लागवड युरोपमध्ये सुरू झाली. त्यानंतर इराण, चीन येथे त्याचे पीक घेतले गेले व आज भारत, चीन, इंडोनेशिया, मलाया, थायलंड, म्यानमार, फिलिपिन्स, कॅरीबिया, आफ्रिका व अमेरिका या सर्व ठिकाणी त्याची लागवड केली जाते. वांगी अतिशय चविष्ट व गुणांनी समृद्ध असल्यामुळे हिवाळा ऋतूमध्ये त्यांना भाज्यांचा राजा म्हणून संबोधले जाते. वांग्यामध्ये प्रामुख्याने जांभळी व पांढरी असे दोन प्रकार आहेत. तसेच आकारानुसार लांबट व गोल असेही दोन प्रकार आहेत. जांभळी लंबगोल बांगी अधिक गुणकारी असतात. वांगी ही आकाराने लिंबापासून ते टरबुजाएवढी असतात. मोठी जांभळी वांगी गरयुक्त असल्याने अनेक वेळा त्याचे भरीत केले जाते. थंडीच्या दिवसांत बाजरीची भाकरी व वांग्याचे भरीत हे सवचिच आवडते जेवण असते. या ऋतूत ते सकसही असते. औषधी गुणधर्म - आयुर्वेदानुसार बांगी ही मधुर, तीक्ष्ण, उष्ण, कफहारक, अग्निप्रदीपक, वीर्यवर्धक, पित्तकारक व पचण्यास हलकी असतात. **(क्रमश:)**

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर
अहिल्यानगर मोबाईल नं- ८७९३४००४००

**वेळ वाचवा, पैसे वाचवा**

**चष्म्याकरीता डोळे तपासण्यासाठी तासन तास बसून राहण्याची व २००-५०० रुपये खर्च करण्याची गरज नसते.**

**क्वॉलिफाईड ऑप्टोमेट्रीस्ट कडून कॉम्प्युटरद्वारे मोफत डोळे तपासणी**

**अल्प किंमतीत, उच्च दर्जाचे चष्मे, पैशांचा पुरेपूर मोबदला..**



आइकर
चष्म्यांचे तज्ज्ञ

पत्ता : कापड बाजार कॉर्नर,
विजय सायकल्स् शेजारी, अहिल्यानगर,
फोन : 9561344374

Eye Q Media

# सथ्था नाईट हायस्कूलच्या विद्यार्थ्यांसाठी करिअरची वारी उपक्रम ठरला प्रेरणादायी



मासूम संस्थेच्या वतीने विद्यार्थ्यांना सायकलींचे वाटप करण्यात आले.

नगर – दिवसभर कष्ट करून रात्री शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना उज्ज्वल भविष्याची दिशा मिळावी, शिक्षणासोबत रोजगार, स्वयंरोजगार आणि कौशल्य विकासाच्या संधींची माहिती व्हावी या उद्देशाने हिंद सेवा मंडळाच्या भाई सथ्था नाईट हायस्कूल व ज्युनिअर कॉलेज येथे करिअरची वारी या अनोख्या संकल्पनेतून करिअर मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. आषाढी वारीच्या पार्श्वभूमीवर आयोजित या कार्यक्रमात विद्यार्थ्यांना शिक्षणानंतर उपलब्ध असलेल्या विविध करिअर संधी, व्यावसायिक अभ्यासक्रम, कौशल्याधारित प्रशिक्षण तसेच स्वयंरोजगाराच्या मार्गांविषयी सखोल मार्गदर्शन करण्यात आले.

या कार्यक्रमाचे प्रमुख आकर्षण म्हणजे मासूम संस्थेच्या वतीने गरजवंत विद्यार्थ्यांना पाच सायकलींचे वाटप करण्यात आले. तसेच सेवानिवृत्त जिल्हा न्यायाधीश चंद्रचूड गोंगले यांनी विद्यार्थ्यांच्या बौद्धिक विकासासाठी स्पर्धा परीक्षा व अवांतर वाचनाची उपयुक्त पुस्तके भेट देण्याबरोबरच शाळेसाठी ११ हजार रुपयांची आर्थिक मदत दिली.

या कार्यक्रमास मासूम संस्थेचे प्रोग्राम हेड अमर डावल (मुंबई), रात्रशाळेचे चेअरमन डॉ. पारस कोठारी, प्राचार्य सुनील सुसरे, इंडियन अॅकॅडमी ऑफ फॅशन डिझायनिंगच्या संचालिका रचना काकडे, मिटकॉनचे सागर गायकवाड यांची प्रमुख उपस्थिती होती.

प्रास्ताविकात रात्रशाळेचे चेअरमन डॉ. पारस कोठारी यांनी विद्यार्थ्यांना उद्देशून सांगितले की, दहावी–बारावीनंतर करिअरचे स्पष्ट ध्येय निश्चित करणे अत्यंत आवश्यक आहे. शिक्षणाची पदवी महत्त्वाची असली तरी प्रत्यक्ष काम करण्याची क्षमता आणि कौशल्य अधिक महत्त्वाचे ठरते. मासूम संस्था केवळ करिअर मार्गदर्शनच करत नाही, तर व्यावसायिक शिक्षणासाठी शिष्यवृत्ती आणि विविध प्रकारचे सहकार्यही करते. विद्यार्थ्यांनी या संधींचा नक्की लाभ घेण्याचे त्यांनी आवाहन केले.

प्राचार्य सुनील सुसरे यांनी उपस्थितांचे स्वागत करून रात्रशाळेत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांची माहिती दिली. शिक्षणासोबत व्यक्तिमत्त्व विकास, करिअर नियोजन आणि कौशल्यविकासावर भर दिला जात असल्याचे त्यांनी सांगितले.

मासूम संस्थेचे प्रोग्राम हेड अमर डावल यांनी इयत्ता दहावी व बारावीच्या विद्यार्थ्यांना शिक्षणानंतर उपलब्ध असलेल्या विविध करिअरच्या संधी, रोजगार आणि स्वयंरोजगाराच्या पर्यायांबाबत मार्गदर्शन केले. मासूम संस्था शिक्षण अर्धवट सोडलेल्या तसेच आर्थिकदृष्ट्या दुर्बल विद्यार्थ्यांना पुन्हा शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी कार्यरत असल्याचे त्यांनी सांगितले.

तसेच त्यांनी विद्यार्थ्यांना शासनाच्या विविध कौशल्य विकास योजना, शिष्यवृत्ती योजना, व्यावसायिक प्रशिक्षण तसेच उद्योग उभारणीसाठी उपलब्ध असलेल्या संधींचाही लाभ घेण्याचे आवाहन केले. इंडियन अकॅडमी ऑफ फॅशन डिझायनिंगच्या संचालिका रचना काकडे यांनी फॅशन डिझायनिंग क्षेत्रातील वाढत्या रोजगाराच्या संधी, उद्योजकता आणि सर्जनशीलतेला मिळणारे व्यासपीठ याविषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. तर मिटकॉनचे सागर गायकवाड यांनी नर्सिंग असिस्टंट, सोलर सिस्टिम टेक्निशियन यांसारख्या रोजगाराभिमुख अभ्यासक्रमांची माहिती दिली.

सेवानिवृत्त जिल्हा न्यायाधीश चंद्रचूड गोंगले यांनी दिवसभर काम करून रात्री शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या जिद्दीचे आणि चिकाटीचे विशेष कौतुक केले. कार्यक्रमात संस्थेच्या संचालिका निकिता केतकर, संचालक कमलाकर माने आणि युवराज बोराडे यांचे विशेष आभार व्यक्त करण्यात आले.

सूत्रसंचालन मंगेश भुते यांनी केले. आभार प्रदर्शन बाळू गोरडे यांनी मानले.

# प्रेरणादायी अक्षरधन

## देखिल्याविण गोष्टी बोलू कैसी?

"मुसाफिर"

संकलन: दिशान फिचर्स




पाहिल्याशिवाय खरे मानणे? अनुभव नसता विश्वास ठेवणे ? विद्वान बोलतोय म्हणून डोलणे ? संपत्ती मिळावी म्हणून माणुसकी विसरणे ? ही सगळी मुर्खाची लक्षणे। ही अवघी विनाशाची कारणे यांना आवरणे, अन्यथा दुःख भोगणे । महाभारतात म्हटलंय, इष्टंच मे स्यादितरश्च न स्यात एनत्कृते कर्मविधिः प्रवृत्तः । इष्टं त्वनिष्टं च न मां भजेते त्येनन्कृते ज्ञानविधिः प्रवृत्तः ।।

मला सतत लाभ होवो. माझी कधी हानी न होवो. त्यासाठी काय बरे वाईट करावे लागेल ते मी करेन. करणे माझ्या हाती आहे. मी श्रीमंत व्हावे, मी सत्ताधीश बनावे. पण म्हणून का अविवेकाने वागावे? त्यासाठी जे काही करायचे ते माणसाला शोभावे । केवळ अनिष्ट होवू नये म्हणून इष्ट नसेल तेही करावे? अनिष्टाची बाधा होउ नये हे खरे. पण इष्ट काय व अनिष्ट काय, हे कळले तर पाहिजे? अनिष्ट टाळण्यासाठी करतो ते प्रसंगी इष्ट असते. पण माणुसकीला काळिमा लावते. म्हणून ते टाळलेच पाहिजे. त्यासाठीच तर ज्ञान आवश्यक ठरते. प्रत्यक्ष पाहावे. अनुभवाने शिकावे वडीलधाऱ्यांचे ऐकावे. ज्ञानाने पवित्र झालेले आचरणात आणावे. ज्ञानमार्गाने कर्ममार्गातील काटे दूर करावेत. संत निवृत्तीनाथांचे या बाबतीत ऐकावे. देवाचे देउळ दिसते दुरुन । देव ऐसा कोण ओळखावा ? ।। दोहीकडे दरडी, मध्ये खोलवट । देखिल्याविण सरिता म्हणू कैसी ? ।

केवळ देवळात राहतो म्हणून का देव ठरतो? दोन्ही बाजूने उंच कडा, मध्ये खोलगटपणा, म्हणून ती काय नदीच असेल हा द्यावा भरवसा ? प्रत्यक्ष पाहिले पाहिजे. मग दिसेल त्यावरुन ओळखले पाहिजे. दुसरा म्हणाला होता, म्हणून का देवळातला दुष्टदेखील सुष्ट म्हणावा ? प्रत्यक्ष ज्ञानाने तर्क खोटा ठरला. अनुभवाने देवळातला रहिवासी नव्हता सद्गुणाराशी. ही फसगत टाळावी. जेथे तेथे पाहतो एकचि हातवटी देखिल्याविण गोष्टी बोलू कैसी ?

झुन्नन नावाच्या एका सुफी संताची गोष्ट आहे. त्याच्याकडे शिकायला मुले येत. जो नव्याने भरती होई त्याला शिकवणीचा दर कमी होई, पण जो आधी दुसऱ्याकडे शिकला होता, त्याला मात्र दुप्पट दर आकारला जाई. पालक आश्चर्यचकित होई. पालक म्हणायचे, हा तर आधीच शिकलाय. हे पहिल्या गुरुचं प्रमाणपत्र आहे. तेव्हा तुम्ही शिकवणीचा दर उलट निम्मा केला पाहिजे. कारण अर्धअधिक शिक्षण त्याचं झालय.

झुन्नन म्हणायचा, नाही, आधी दुसऱ्याकडे शिकलेल्याला शिकवणीचा दुप्पट दर आकारणेच इष्ट होय. कारण तो आधी शिकला होता ते सगळे अनिष्ट घालवायला माझी दुप्पट शक्ती आणि वेळ खर्ची पडेल.

त्यावर पालक म्हणायचे, म्हणजे आधी शिकला ते वाया गेले?

झुन्नन म्हणायचा, होय कारण ते इष्टच असेल हे कसे सांगावे? त्यापेक्षा ते आधी नष्टच करणे इष्ट ठरावे. म्हणून शिकवणीचे दर दुप्पट वाढवणे गरजेचे व्हावे.

– किशोर गांधी

# हिंदु जनजागृती समितीतर्फे २९ जुलैला गुरुपौर्णिमा महोत्सव; देशभरात ६४ ठिकाणी तर नगरमध्ये दोन ठिकाणी आयोजन

नगर – हिंदू धर्मावरील विविध वैचारिक आणि सामाजिक आव्हानांच्या पार्श्वभूमीवर धर्मरक्षण, स्वसंरक्षण आणि हिंदू संघटन यांविषयी जनजागृती करण्याच्या उद्देशाने हिंदू जनजागृती समितीच्या वतीने २९ जुलै रोजी देशभरातील ६४ ठिकाणी गुरुपौर्णिमा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. अहिल्यानगर जिल्ह्यातही दोन ठिकाणी हा महोत्सव सायंकाळी ५.३० वाजता होणार असून, हिंदूंनी मोठ्या संख्येने सहकुटुंब सहभागी व्हावे, असे आवाहन समितीने केले आहे.

महोत्सवात श्री व्यासपूजन, प.पू. भक्तराज महाराज यांच्या प्रतिमेचे गुरुपूजन, रामराज्य स्थापनेचा संकल्प व नामजप, धर्मरक्षक आणि हिंदूनिष्ठ व्यक्तींचा सत्कार, तसेच राष्ट्रभक्त आणि धर्मनिष्ठ मान्यवरांचे मार्गदर्शन आयोजित करण्यात आले आहे. याशिवाय स्वसंरक्षणाच्या सोप्या पद्धतींची प्रात्यक्षिके, समितीचे प्रेरणास्थान सच्चिदानंद परब्रह्म डॉ. आठवले यांच्या कार्यावरील लघुपट, तसेच रामराज्य अर्थात हिंदु राष्ट्राच्या स्थापनेसाठीचा संघर्ष आणि साधनेची दिशा या विषयावरील विशेष व्याख्यान होणार आहे. महोत्सवादरम्यान विविध विषयांवरील ग्रंथप्रदर्शन आणि राष्ट्र–धर्म विषयक फलकप्रदर्शनही भरविण्यात येणार आहे.

अहिल्यानगरमध्ये मार्कंडेय संकुल, नेप्ती चौक, नालेगाव तसेच श्री विठ्ठल–रुक्मिणी मंदिर, विठ्ठलनगर, पाईपलाईन रोड, सावेडी येथे सायंकाळी ५.३० वाजता महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे.

माहितीसाठी श्री. रामेश्वर भुकन (मो. ८३२९३०२९५५) यांच्याशी संपर्क साधावा, असे हिंदू जनजागृती समितीच्या वतीने कळविण्यात आले आहे.

# डॉ. एन. जे. पाऊलबुधे तंत्रनिकेतनच्या विद्यार्थ्यांची नामांकित कंपन्यांमध्ये निवड



पाऊलबुधे तंत्रनिकेतन कॉलेजमध्ये कॅम्पस मुलाखती घेताना कंपन्यांचे अधिकारी. (छाया – विजय मते)

नगर – नगर–सोलापूर रोडवरील नारायणडोह येथील डॉ. एन. जे. पाऊलबुधे तंत्रनिकेतन कॉलेज येथे आयोजित कॅम्पस मुलाखतीतून अंतिम वर्ष मेकॅनिकल इंजिनिअरिंगच्या विद्यार्थ्यांना अहिल्यानगर येथील नामांकित कंपन्यांमध्ये नोकरीसाठी निवड झाली आहे.

महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळाद्वारे एप्रिल–मे २०२६ मध्ये घेण्यात आलेल्या पदविका परीक्षांचा निकाल नुकताच जाहीर झाला. यामध्ये उत्तीर्ण झालेल्या अंतिम वर्ष मेकॅनिकल इंजिनिअरिंगच्या विद्यार्थ्यांसाठी महाविद्यालयात कॅम्पस मुलाखतींचे आयोजन करण्यात आले होते. अहिल्यानगर येथील कायनेटिक इंजिनिअरिंग आणि एमआयडीसीमधील सिद्धी फोर्जिंग कंपनीच्या प्रतिनिधींनी विद्यार्थ्यांच्या मुलाखती घेतल्या. विद्यार्थ्यांची गुणवत्ता, कौशल्ये आणि आवड लक्षात घेऊन त्यांना योग्य क्षेत्रात काम करण्याची संधी देण्याचे कंपनी प्रतिनिधींनी जाहीर केले.

या मुलाखती प्रक्रियेत कायनेटिक इंजिनिअरिंगचे एच. आर. सुनील मंडलिक, रिक्रुटमेंट ऑफिसर कृष्णा माकोणे, टी.एस.पी. एल.चे मॅनेजर सचिन पंडित, एच.आर. अनिकेत भिंगारदिवे तसेच सिद्धी फोर्जिंगचे एच.आर. माधव बोचरे यांनी सहभाग घेतला. त्यांनी विद्यार्थ्यांना त्यांच्या अनुभवाबाबत प्रश्न विचारून कामाच्या क्षेत्राची निवड करण्याबाबत मार्गदर्शन केले. यामुळे अनेक विद्यार्थ्यांना रोजगाराची संधी मिळाली.

याबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य बाळासाहेब बोर्डे यांनी कंपनी व्यवस्थापनाचे आभार मानले. कॅम्पस मुलाखती यशस्वी करण्यासाठी उपप्राचार्य रवींद्र देशपांडे, प्लेसमेंट प्रमुख विश्वनाथ आदवडे, मेकॅनिकल विभाग प्रमुख जाबीर अली आणि अकॅडमिक प्रमुख जयश्री होले यांनी विशेष परिश्रम घेतले.

अहिल्यानगर येथील नामांकित कंपन्यांमध्ये निवड झालेल्या सर्व विद्यार्थ्यांचे सेवा शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष विनय पाऊलबुधे, संचालक साई पाऊलबुधे, प्राचार्य बाळासाहेब बोर्डे, तंत्रनिकेतनचे सर्व विभागप्रमुख व अध्यापकांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (गवई) मध्ये नगर तालुका, भिंगारमधील युवकांचा प्रवेश



रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (गवई) पक्षात प्रवेश केलेल्या तरुणांचा सत्कार करताना शहर जिल्हाध्यक्ष सुशांत म्हस्के.

नगर – रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (गवई) पक्षाच्या संघटन विस्ताराला गती देण्यासाठी नगर तालुका व भिंगार परिसरातील अनेक युवकांनी पक्षात जाहीर प्रवेश केला. सर्जेपुरा येथील पक्षाच्या कार्यालयात आयोजित प्रवेश व नियुक्ती सोहळ्यात नव्या कार्यकर्त्यांचे स्वागत करण्यात आले.

नजीर देशमुख यांची रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (गवई) अल्पसंख्याक नगर तालुकाध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली. शुभम ठोंबे यांच्यावर नगर तालुका युवक अध्यक्षपदाची जबाबदारी सोपविण्यात आली. तर अजीज शेख यांची भिंगार शहर उपाध्यक्षपदी नियुक्ती जाहीर करण्यात आली. शहर जिल्हाध्यक्ष सुशांत म्हस्के यांच्या हस्ते नियुक्तीपत्रे देऊन नव्या पदाधिकाऱ्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी गुलाम शेख, विजय शिरसाठ, अजीम खान, सचिन शिंदे, स्वप्नील साठे, नईम शेख, लकी वाघमारे, अरबाज शेख, योहान चाबुकस्वार, जमीर शेख आणि हुसेन चौधरी यांच्यासह पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

दरम्यान, फिरोज देशमुख, सोहेल पठाण, सचिन ठोंबे, अमोल ठोंबे, समीर देशमुख, अण्णासाहेब चेमटे, बाबासाहेब शेख, रवी ठोंबे, सूरज चेमटे, सुनील टांगळ, रवींद्र ठोंबे, ऋषिकेश डहाळे, आकाश ठोंबे, सुहास ठोंबे, सोहम ठोंबे, राहुल ठोंबे, अमर ठोंबे आणि प्रथमेश ठोंबे यांनी पक्षात प्रवेश करून पक्षाची ध्येयधोरणे जनतेपर्यंत पोहोचविण्याचा निर्धार व्यक्त केला.

सुशांत म्हस्के म्हणाले, आजच्या काळात समाजातील सुशिक्षित आणि गुणवंत युवकांना रोजगार, शिक्षण आणि न्यायासाठी रस्त्यावर उतरावे लागत आहे, ही लोकशाहीसाठी चिंतेची बाब आहे. सत्तेच्या जोरावर गुंड प्रवृत्तीला संरक्षण मिळत असताना सामान्य नागरिकांचा आवाज दाबण्याचा प्रयत्न होत आहे. अशा परिस्थितीत रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (गवई) ही डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या समता, बंधुता आणि सामाजिक न्यायाच्या विचारांवर चालणारी चळवळ असून अन्यायाविरोधात ठामपणे उभी आहे.

नवनियुक्त पदाधिकाऱ्यांनी पक्षाने सोपविलेली जबाबदारी प्रामाणिकपणे पार पाडण्याचा निर्धार व्यक्त केला. नगर तालुका व भिंगार परिसरात पक्ष संघटना अधिक बळकट करणे, युवकांना संघटित करणे आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा प्रसार करण्यासाठी सातत्याने कार्य करण्याची ग्वाही त्यांनी दिली.



लक्ष्मीबाई भाऊराव पाटील विद्यालयात रंगलेला बाल वारकऱ्यांचा रिंगण सोहळा.

# लक्ष्मीबाई भाऊराव पाटील विद्यालयाच्या बाल दिंडीत विठ्ठल नामाचा गजर

नगर – आषाढी एकादशीच्या पार्श्वयभूमीवर रयत शिक्षण संस्थेच्या कापड बाजार येथील लक्ष्मीबाई भाऊराव पाटील प्राथमिक व माध्यमिक विद्यालयाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या बाल वारकरी दिंडी सोहळ्याला विद्यार्थी, शिक्षक आणि पालकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

बाल वारकऱ्यांनी पारंपरिक वारकरी संप्रदायाचा पोशाख परिधान करून दिंडीत सहभाग घेतला.

दिंडीचा प्रारंभ विद्यालयातून झाला. कापड बाजार, नवी पेठ आणि अर्बन बँक मार्गे ही दिंडी पार पडली. मार्गात ठिकठिकाणी नागरिकांनी बाल वारकऱ्यांचे स्वागत करून त्यांच्यावर पुष्पवृष्टी केली. दिंडी पुन्हा विद्यालयात परतल्यानंतर शाळेच्या प्रांगणात पारंपरिक रिंगण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. या बालदिंडीसाठी प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका लक्ष्मीताई आहेर व माध्यमिकाच्या ज्येष्ठ शिक्षिका सुनीता लांडगे यांचे मार्गदर्शन लाभले. तसेच प्राथमिक व माध्यमिक विभागातील सर्व शिक्षक–शिक्षिका आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी नियोजन, सजावट, सांस्कृतिक कार्यक्रम आणि दिंडीचे यशस्वी आयोजन करण्यासाठी परिश्रम घेतले.



प्रेमदान चौकात नाकाबंदीसाठी दाखल झालेले शहर वाहतूक शाखेचे पथक.

# प्रेमदान चौकात वाहतूक शाखेची नाकाबंदी; नियमभंग करणाऱ्या वाहनचालकांवर कारवाई

नगर – शहर वाहतूक शाखेच्या वतीने प्रेमदान चौक येथे नाकाबंदी करून वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनचालकांवर कारवाई करण्यात आली.

२४ जुलै रोजी दुपारी ४ ते सायंकाळी ६ या वेळेत राबविण्यात आलेल्या या मोहिमेत फॅन्सी नंबर प्लेट, ब्लॅक फिल्म, विना नंबर प्लेट वाहने, विना परवाना वाहन चालविणे, एचएसआरपी नंबर प्लेट नसणे तसेच वाहन चालविताना परवाना जवळ न बाळगणे अशा विविध प्रकारच्या नियमभंगांवर मोटार वाहन कायद्यानुसार कारवाई करण्यात आली.

या नाकाबंदी मोहिमेत वाहतूक शाखेचे पीएसआय परदेशी, पीएसआय गायकवाड, पीएसआय शिरसाट, एएसआय कोडम, पीसी चव्हाण, पीसी जपकर, पीसी दळवी, पीसी खंडागळे, पीसी आवारे, पीसी दहिफळे आणि पीसी शिंदे यांनी सहभाग घेतला. वाहतूक नियमांचे पालन करणे, वाहनांवर आवश्यक कागदपत्रे ठेवणे आणि सुरक्षित वाहतुकीसाठी नागरिकांनी सहकार्य करावे, असे आवाहन वाहतूक शाखेच्या वतीने करण्यात आले.

# आरोग्याचा संदेश देत 'लिटिल स्कॉलर्स'ची दिंडी



तपोवन रोड येथील लिटिल स्कॉलर्स प्री प्रायमरी स्कूलमध्ये रंगलेला दिंडी सोहळा.

नगर – तपोवन रोड येथील लिटिल स्कॉलर्स प्री प्रायमरी स्कूलमध्ये आषाढी एकादशी मोठ्या उत्साहात, भक्तिमय वातावरणात आणि पारंपरिक पद्धतीने साजरी करण्यात आली. यानिमित्त शाळेतील ३ ते ५ वर्षांच्या चिमुकल्यांनी वारकऱ्यांच्या वेशभूषेत आकर्षक दिंडी काढून संपूर्ण परिसर विठ्ठलनामाच्या गजराने दुमदुमून टाकला.

दिंडीदरम्यान चिमुकल्यांनी पाऊले चालती वारीची, वाट ही आपुल्या आरोग्याची... हे आरोग्य जनजागृतीवर आधारित वारीचे गीत सादर केले. या गीतातून हात स्वच्छ धुणे, पौष्टिक आहार घेणे, फळे–भाज्या खाणे, नियमित व्यायाम करणे आणि स्वच्छतेचे महत्त्व याबाबत अतिशय सोप्या भाषेत संदेश देण्यात आला. आरोग्य आणि अध्यात्म यांचा सुंदर संगम घडविणाऱ्या या उपक्रमाचे सर्वांनी कौतुक केले.

या उपक्रमातून विद्यार्थ्यांमध्ये वारकरी परंपरेची ओळख करून देतानाच स्वच्छता, आरोग्य, शिस्त, सामूहिक सहभाग आणि सामाजिक जाणीव यांसारख्या मूल्यांचे संस्कार करण्यात आले. लहान वयातच संस्कृतीची गोडी आणि निरोगी जीवनशैलीचे महत्त्व रुजविण्याचा शाळेचा हा प्रयत्न अत्यंत स्तुत्य ठरला. मुलांनी उत्स्फूर्तपणे गाणी, अभंग आणि विठ्ठलनामाचा गजर करत वातावरण भक्तिमय केले.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी शाळेच्या प्राचार्या सौ संगीता जाधव, सौ स्मिता थोरात, नम्रता गोळे, मंगेश आहेर, साक्षी भांड, प्रणव जाधव, शिक्षिका, शिक्षकेतर कर्मचारी तसेच पालकांनी परिश्रम घेतले.

# सजग ग्राहक होण्यासाठी विद्यार्थ्यांनी प्रत्येक घटनेचे विश्लेषण करावे : संज्योत रसाळ



नगर – विद्यार्थी हा चौकस बुद्धीचा आणि सभोवती घडणाऱ्या घटनांचा डोळसपणे वेध घेणारा असावा. दैनंदिन जीवनात अनेक घटनांना सामोरे जाताना प्रत्येक घटनेचे विश्लेषण करण्याची क्षमता विद्यार्थ्यांमध्ये विकसित होणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन ग्राहक पंचायतच्या अहिल्यानगर जिल्हा शाखेच्या महिला संघटिका संज्योत रसाळ यांनी केले.

ग्राहक पंचायत महाराष्ट्र, अहिल्यानगर जिल्हा शाखेतर्फे येथील समर्थ शाळेत आयोजित सजग विद्यार्थी ग्राहक अभियान अंतर्गत त्या बोलत होत्या. यावेळी ग्राहक पंचायतचे सहसचिव संजय जोशी व महिला सदस्या आशाताई सातपुते उपस्थित होत्या.

रसाळ म्हणाल्या, शालेय जीवनात विद्यार्थ्यांच्या वापरातील बहुतांश वस्तूंची खरेदी पालक करतात; मात्र त्या वस्तूंचा वापर विद्यार्थ्यांनाच करायचा असतो. त्यामुळे विद्यार्थ्यांनी आतापासूनच पालकांकडून होणाऱ्या प्रत्येक खरेदीकडे सजगपणे लक्ष द्यावे. वस्तूवरील एमआरपी, एक्सपायरी डेट, उत्पादनाची शुद्धता, खाद्यपदार्थांची निर्मिती तारीख, ताजेपणा आणि गुणवत्ता यांची माहिती घेण्याची सवय लावून घ्यावी, असेही त्यांनी सांगितले.

यावेळी जिल्हा सचिव अॅड. सिद्धार्थ वाघमारे यांनी विद्यार्थ्यांना ग्राहकांचे हक्क आणि कर्तव्ये याविषयी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक विद्यालयाच्या मुख्याध्यापिका वसुधा जोशी यांनी केले. कार्यक्रमात ग्राहक पंचायतच्या पदाधिकाऱ्यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधून त्यांच्या विविध प्रश्नांची समर्पक उत्तरे दिली.

# भाडे उत्पन्नाऐवजी क्षेत्रफळानुसार मालमत्ता कर आकारणी करावी

**नगरसेविका नळकांडे यांची मागणी**



नगर – अहिल्यानगर महानगरपालिका हद्दीतील मालमत्ताधारकांना (कुळांना) भाड्याच्या उत्पन्नावर आधारित मालमत्ता कर आकारणी न करता क्षेत्रफळानुसार मालमत्ता कर आकारावा, तसेच नागरिकांच्या उदरनिर्वाहाचा विचार करून न्यायपूर्ण निर्णय घ्यावा, अशी मागणी नगरसेविका वैशाली शाम नळकांडे यांनी केली आहे. याबाबत त्यांनी महापौर जोती गाडे यांना निवेदन दिले.

महानगरपालिका कार्यक्षेत्रातील इमारती व जमिनींच्या पुनर्मूल्यांकनासाठी मे. सी. ई. इन्फो सिस्टीम लि. या संस्थेची नियुक्ती करण्यात आली होती. या संस्थेने भाडेकरूंकडून मिळणाऱ्या भाड्यावर आधारित करपात्र मूल्य निश्चित करून मालमत्ताधारकांना नोटिसा पाठविल्या आहेत. मात्र, ही कर आकारणी पद्धत अहिल्यानगरमधील सर्वसामान्य, मध्यमवर्गीय कुटुंबांसाठी आर्थिकदृष्ट्या त्रासदायक ठरत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

अहिल्यानगर शहरात अल्प व्यावसायिक, ज्येष्ठ नागरिक तसेच पेन्शन नसलेले कर्मचारी मोठ्या प्रमाणात आहेत. अनेक कुटुंबांनी कर्ज काढून घरे बांधली असून, भाड्याच्या अल्प उत्पन्नातून ते आपला उदरनिर्वाह चालवतात. मात्र, नवीन घरपट्टी आकारणीत त्यांच्या उत्पन्नातील मोठा हिस्सा महानगरपालिकेच्या करासाठी खर्च होत असल्याने वीजबिल, आयकर, घराची देखभाल आणि कर्जाचे हप्ते भरणे कठीण होत असल्याचे नगरसेविका नळकांडे यांनी म्हटले आहे. भाडेकरू काही महिन्यांसाठी राहत असला तरी संपूर्ण वर्षाच्या भाड्यावर कर आकारला जात असल्याने अनेक कुटुंबांवर अन्यायकारक आर्थिक भार पडत आहे. मालमत्ताधारकांना मिळणारे भाडे हे त्यांच्या उदरनिर्वाहाचे महत्त्वाचे साधन असल्याचेही त्यांनी निवेदनात नमूद केले.

नगरसेविका वैशाली नळकांडे यांनी भाडे उत्पन्नावर आधारित कर आकारणी रद्द करून मालमत्ता कर क्षेत्रफळानुसार आकारण्यात यावा, अशी मागणी केली. तसेच पुनर्मूल्यांकन प्रक्रियेसाठी मे. सी. ई. इन्फो सिस्टीम लि. या संस्थेला सुमारे १५ कोटी द्यावे लागणार असून, हा खर्च जनतेच्या करातून वसूल होणार असल्यास त्याचा अतिरिक्त भार सर्वसामान्य नागरिकांवर का टाकला जात आहे, असा सवालही त्यांनी उपस्थित केला.

# 'आयुष इंटरनॅशनल'चे गणेश तनपुरे यांना 'महा अ‍ॅक्युपंक्चर रत्न पुरस्कार' प्रदान



गणेश तनपुरे यांना छत्रपती संभाजीनगर येथे महाअ‍ॅक्युपंक्चर रत्न पुरस्कार प्रदान करण्यात आला.

नगर – आयुष इंटरनॅशनल मेडिकल असोसिएशन (एजीएमए) च्या वतीने अ‍ॅक्युपंक्चर क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल अहिल्यानगर येथील सुप्रसिद्ध अ‍ॅक्युपंक्चरतज्ज्ञ तथा आयुष इंटरनॅशनल मेडिकल असोसिएशनचे जिल्हा सचिव गणेश निवृत्ती तनपुरे यांना प्रतिष्ठेचा महाअ‍ॅक्युपंक्चर रत्न पुरस्कार प्रदान करण्यात आला.

छत्रपती संभाजीनगर येथील यशवंतराव चव्हाण नाट्यगृहात १९ जुलै रोजी झालेल्या पुरस्कार वितरण सोहळ्यात मान्यवरांच्या हस्ते त्यांना हा सन्मान प्रदान करण्यात आला. अ‍ॅक्युपंक्चर उपचारपद्धतीचा प्रसार, रुग्णसेवा आणि आरोग्य क्षेत्रातील सातत्यपूर्ण योगदानाची दखल घेऊन हा पुरस्कार देण्यात आला. या सोहळ्यास प्रमुख पाहुणे म्हणून मराठी चित्रपट अभिनेते डॉ. सुयोग गोऱ्हे, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या अल्पसंख्याक विभागाचे प्रदेशाध्यक्ष अ‍ॅड. नाझेर काझी, अ‍ॅड. दत्तात्रय जाधवर आणि अ‍ॅड. नागेश सोनुने, आयुष इंटरनॅशनल मेडिकल असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. सतीश कराळे, उपाध्यक्ष डॉ. नितीनराजे पाटील, राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. बाबुराव कानडे, डॉ. अभिजित कवठकर, प्रशांत सावंत, दिशा चव्हाण, विजय नवल पाटील, तुषार वाघूळदे, डॉ. राजेंद्र गोऱ्हे उपस्थित होते.



केडगाव ज्येष्ठ नागरिक संघातर्फे माजी प्राचार्य दत्तात्रय घोडके यांचा गौरव करताना रमेश गवळी, सचिव प्रल्हाद साठे, बबनराव कोतकर आदी. (छाया – अमित मन्यार)

# केडगाव ज्येष्ठ नागरिक संघातर्फे माजी प्राचार्य घोडके यांचा गौरव

नगर – केडगाव ज्येष्ठ नागरिक संघाच्या वतीने यंदाचा जीवनगौरव पुरस्कार माजी प्राचार्य प्रा. दत्तात्रय नारायण घोडके यांना सपत्नीक प्रदान करून त्यांच्या शैक्षणिक आणि सामाजिक कार्याचा गौरव करण्यात आला.

संघाचे अध्यक्ष रमेश गवळी, सचिव प्रल्हाद साठे, बबनराव कोतकर तसेच संघाचे पदाधिकारी, सदस्य आणि मान्यवरांच्या उपस्थितीत हा सन्मान सोहळा पार पडला. यावेळी प्रा. घोडके यांनी शिक्षण क्षेत्रात अनेक दशकांपासून दिलेल्या योगदानाचा गौरव करण्यात आला. विद्यार्थ्यांना दिलेले प्रेरणादायी मार्गदर्शन, शाळा व शैक्षणिक संस्थांच्या उन्नतीसाठी केलेले प्रयत्न तसेच समाजहिताच्या विविध उपक्रमांमध्ये घेतलेला सक्रिय सहभाग याबद्दल उपस्थितांनी त्यांचे कौतुक केले. अध्यक्ष रमेश गवळी यांनी प्रा. घोडके हे शैक्षणिक क्षेत्रातील आदर्श व्यक्तिमत्त्व असून त्यांची निष्ठा, कार्यतत्परता आणि समाजसेवा प्रेरणादायी असल्याचे सांगितले. सचिव प्रल्हाद साठे यांनीही प्रा. घोडके यांच्या शैक्षणिक आणि सामाजिक योगदानाचा आढावा घेत त्यांना पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.

सन्मान स्वीकारताना प्रा. दत्तात्रय नारायण घोडके यांनी हा पुरस्कार आपल्या सहकाऱ्यांचाही सन्मान असल्याची भावना व्यक्त केली. शिक्षण आणि समाजसेवेची आपली बांधिलकी कायम राहील तसेच भविष्यातही सामुदायिक कार्यासाठी सक्रियपणे योगदान देत राहणार असल्याचे त्यांनी सांगितले.

# डॉन बॉस्को विद्यालयात दोन दिवसीय मोफत तपासणी व औषध वाटप शिबीर



डॉन बॉस्को शैक्षणिक संकुलात विद्यार्थ्यांसाठी मोफत आरोग्य तपासणी व औषध वाटप शिबीर घेण्यात आले.

नगर – सावेडीतील डॉन बॉस्को शैक्षणिक संकुलात विद्यार्थ्यांसाठी दोन दिवसीय मोफत वैद्यकीय तपासणी व औषध वाटप शिबीर घेण्यात आले. या शिबिरात प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक व इंग्रजी माध्यमातील सुमारे १८०० विद्यार्थ्यांची सर्वांगीण आरोग्य तपासणी करण्यात आली.

अहमदनगर होमिओपॅथिक मेडिकल कॉलेजच्या १०० विद्यार्थी डॉक्टरांनी तज्ज्ञ प्राध्यापकांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी केली. यामध्ये विद्यार्थ्यांची बीएमआय, रक्तगट, हिमोग्लोबिन तसेच इतर आवश्यक आरोग्य तपासण्या करण्यात आल्या. आरोग्यदायी जीवनशैली, संतुलित आहार, वैयक्तिक स्वच्छता आणि पुरेशी झोप याबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. आवश्यक विद्यार्थ्यांना मोफत होमिओपॅथिक औषधांचे वितरण करण्यात आले. विद्यालयाचे प्राचार्य रेव्ह. फा. अजित मुनिस यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित या शिबिरात अहमदनगर होमिओपॅथिक मेडिकल कॉलेजचे प्राचार्य डॉ. पवार, डॉ. वैशाली काकडे, डॉ. नाझीमा सय्यद, तसेच प्राध्यापक आणि विद्यार्थी डॉक्टरांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवून शिबीर यशस्वी करण्यासाठी मोलाचे सहकार्य केले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या आरोग्याबाबत जागरूकता निर्माण होण्यास मदत झाली असून, वेळेवर आरोग्य तपासणी व वैद्यकीय सल्ला मिळाल्याने पालक आणि शिक्षकांनी या उपक्रमाचे कौतुक करून समाधान व्यक्त केले.

# तरुणाला रस्त्यात अडवून लाकडी दांडक्याने बेदम मारहाण; ८ जणांच्या विरोधात गुन्हा दाखल

नगर – उपनगरातील गजरानगर परिसरात पेट्रोल भरण्यासाठी चाललेल्या तरुणाला शिवीगाळ करत लाकडी दांडक्याने बेदम मारहाण केल्याची आणि जिवे मारण्याची धमकी दिल्याची घटना घडली आहे. या हल्लयात तरुणाचा सोन्याचा बदामही गहाळ झाला असून, याप्रकरणी एमआयडीसी पोलीस ठाण्यात तिघांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत आकाश रामेश्वर धनवटे (वय २७, रा. मिरावली बाबा पहाडच्या खालच्या बाजूस, वारूळवाडी, ता. नगर) याने फिर्याद दिली आहे. फिर्यादी तरुण १८ जुलै रोजी रात्री ८:३० वाजण्याच्या सुमारास आपल्या हिरो होंडा स्प्लेंडर मोटरसायकलवरून गांधीजी पेट्रोल पंपावर पेट्रोल भरण्यासाठी जात होते. काळा माथा जवळील डॉ. परवेज खान यांच्या दवाखान्यासमोरून जात असताना आरोपींनी त्यांना अडवले.

आरोपी सतीश साहेबराव कर्डिले याने आकाश यांना शिवीगाळ करत लाकडी दांडक्याने डाव्या हातावर जोरदार प्रहार केला, तर त्याच्यासोबत असलेल्या रोहन धोत्रे आणि साहिल धोत्रे, दीपक भानखिले, चिम्या गायकवाड, बारीक पेढेवाला, ओमकार किशोर डुकरे शेख टेलर यांनीही या हल्लयात साथ दिली. या मारहाणीदरम्यान आरोपींनी आकाश यांना जिवे मारण्याची धमकी दिली. तसेच या घटनेत आकाश यांच्या गळ्यातील सोन्याचा बदामही चोरीला गेला आहे.

या प्रकरणी आकाश धनवटे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून २३ जुलै रोजी एमआयडीसी पोलीस ठाण्यात आरोपींविरोधात भारतीय न्याय संहिता कलम ११८(१), ११५(२), ३५२, ३५१(२), १८९(२) आणि १९१ (२) अन्वये गुन्हा नोंदवण्यात आला आहे. एमआयडीसी पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक हेमंत थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली पो.हे.कॉ. खामकर या प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत.

# अखिल भारतीय काँग्रेसच्या ओबीसी विभागाच्या राष्ट्रीय समन्वयकपदी मंगल भुजबळ यांची नियुक्ती



नगर – भारतीय राष्ट्रीय काँग्रेसने आगामी २०२९ च्या लोकसभा व विधानसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर महिला नेतृत्व अधिक सक्षम करण्याच्या उद्देशाने राष्ट्रीय स्तरावर ओबीसी महिला संघटना बळकट करण्याचा निर्णय घेतला आहे. या अंतर्गत देशभरातून २६ महिला राष्ट्रीय समन्वयकांची नियुक्ती करण्यात आली असून, त्यामध्ये अहिल्यानगरच्या मंगल भुजबळ यांची अखिल भारतीय काँग्रेस कमिटीच्या ओबीसी विभागाच्या राष्ट्रीय समन्वयकपदी सलग दुसऱ्यांदा नियुक्ती करण्यात आली आहे.

गेल्या दोन दशकांपासून काँग्रेस पक्षाच्या माध्यमातून सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात सातत्याने कार्यरत असलेल्या मंगल भुजबळ यांच्या प्रामाणिक, निष्ठावान आणि प्रभावी कार्याची दखल घेत पक्षाने त्यांच्यावर पुन्हा एकदा राष्ट्रीय स्तरावरील महत्त्वाची जबाबदारी सोपविली आहे.

सन २००६ मध्ये युवक काँग्रेसमधून राजकीय कारकिर्दीला प्रारंभ करणाऱ्या मंगल भुजबळ यांनी नगर शहर, अहिल्यानगर जिल्हा तसेच प्रदेश काँग्रेसमध्ये विविध पदांवर काम केले आहे. त्यांच्या संघटन कौशल्याची, अभ्यासू वक्तृत्वाची आणि आक्रमक नेतृत्वशैलीची दखल घेत २०२२ मध्ये त्यांची राष्ट्रीय सहसमन्वयक म्हणून नियुक्ती करण्यात आली होती. यानंतर त्यांच्याकडे राजस्थान राज्याच्या सहप्रभारीपदाची जबाबदारी सोपविण्यात आली. तसेच २०२३ च्या कर्नाटक विधानसभा निवडणुकीत गुलबर्गा मतदारसंघाच्या निरीक्षक म्हणून त्यांनी जबाबदारी पार पाडली. या मतदारसंघात सुमारे २० वर्षांनंतर काँग्रेसला विजय मिळवून देण्यात त्यांनी महत्त्वपूर्ण योगदान दिल्याचे पक्षाकडून नमूद करण्यात आले आहे. त्यानंतर त्यांची राष्ट्रीय समन्वयक म्हणून नियुक्ती करण्यात आली आणि मध्य प्रदेश राज्याच्या प्रभारीपदाची जबाबदारीही त्यांच्याकडे सोपविण्यात आली.

गेल्या चार वर्षांपासून राष्ट्रीय स्तरावर सातत्याने कार्यरत असलेल्या मंगल भुजबळ यांनी आपल्या कामातील सातत्य, पक्षनिष्ठा आणि प्रभावी संघटनशैलीमुळे राष्ट्रीय ओबीसी काँग्रेसमध्ये सक्षम, अभ्यासू आणि धडाडीच्या नेत्या म्हणून वेगळी ओळख निर्माण केली आहे. याच कार्याची दखल घेत त्यांची दुसऱ्यांदा राष्ट्रीय समन्वयकपदी नियुक्ती करण्यात आली आहे.

या नियुक्तीबद्दल मंगल भुजबळ यांनी काँग्रेसचे लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी, काँग्रेस नेत्या सोनिया गांधी, खासदार प्रियंका गांधी, काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे, राष्ट्रीय ओबीसी अध्यक्ष डॉ. अनिल जयहिंद, राष्ट्रीय ओबीसी उपाध्यक्ष भानुदास माळी, काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ, विधिमंडळ नेते विजय वडेट्टीवार, माजी प्रदेशाध्यक्ष नाना पटोले तसेच काँग्रेस वर्किंग कमिटीचे सदस्य व माजी विधिमंडळ नेते बाळासाहेब थोरात यांच्यासह पक्षाच्या राष्ट्रीय नेतृत्वाचे आणि सर्व वरिष्ठ पदाधिकाऱ्यांचे आभार मानले.

# रोटरी क्लब डिग्निटीच्या अध्यक्षपदी अभिषेक भगत तर सचिवपदी डॉ. वैशाली पाटील यांची निवड



नगर – विविध उपक्रमांद्वारे सामाजिक क्षेत्रात योगदान देणाऱ्या रोटरी क्लब ऑफ डिग्निटी या संस्थेच्या २०२६ – २७ या वर्षासाठी अध्यक्षपदी रोटेरीयन अ‍ॅड. अभिषेक भगत तर सचिवपदी रोटेरीयन डॉ. वैशाली पाटील यांची निवड झाली आहे.

क्लबचे नूतन अध्यक्ष रो. अ‍ॅड. अभिषेक भगत हे बुऱ्हाणनगरच्या तुळजाभवानी देवी मंदिराचे पुजारी असून गेल्या अनेक वर्षांपासून वकिली, क्रीडा, आध्यात्मिक व सामाजिक क्षेत्रात योगदान देत आहेत. अहमदनगर बार असोसिएशनच्या सचिवपदी त्यांची दोन वेळा निवड झाली आहे. तसेच जिल्हा तालीम संघाचे उपाध्यक्ष व नगर तालुका कार्याध्यक्षपदी काम करत आहेत. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ प्रतिनिधी म्हणून देखील जबाबदारी सांभाळली आहे. अ‍ॅड. अभिषेक भगत रोटरी क्लबच्या सामाजिक कामात सक्रीय सहभाग असून गेल्या वर्षी क्लबचे सचिव म्हणूनही त्यांनी उत्कृष्ट काम केले.

क्लबच्या नूतन सचिव रो. डॉ. वैशाली पाटील या प्रसिद्ध दंत शल्यचिकित्सक असून यांनी संरक्षण मंत्रालयांतर्गत ईसीएचएसमध्ये ९ वर्षे दंत अधिकारी म्हणून सेवा बजावली आहे. तसेच पारनेर विपश्यना समितीच्या विश्वस्त म्हणून आध्यात्मिक कार्यात सक्रिय सहभाग घेत आहेत. डॉ. पाटील यांनी एमपीएससी, यूपीएससी, नीट आणि इतर स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी यशश्री स्टडी लायब्ररी उपलब्ध करून दिली आहे. स्वर्गीय डॉ. संजय पाटील यांच्या त्या पत्नी आहेत.



ग्रीन सिटीच्या ट्री बँकेला धनश्री विखे पाटील यांनी भेट देवून विविध देशी वृक्षांची माहिती घेतली. (छाया–लहू दळवी)

# अहिल्यानगर ग्रीन सिटीच्या ट्री बँकेला धनश्री विखे पाटील यांची भेट

नगर – शहरात उपमहापौर अ‍ॅड. धनंजय जाधव यांच्या संकल्पनेतून सुरू असलेल्या नामदार राधाकृष्ण विखे पाटील ग्रीन सिटी मोहिमेअंतर्गत उभारण्यात आलेल्या ट्री बँकेला धनश्री सुजय विखे पाटील यांनी भेट देऊन विविध देशी वृक्षांची सविस्तर माहिती घेतली. पर्यावरण संवर्धन, वृक्षारोपण आणि वृक्ष संगोपनासाठी राबविण्यात येणाऱ्या या उपक्रमाचे त्यांनी मनापासून कौतुक करत नागरिकांनी सहभागी होऊन हरित अहिल्यानगर घडविण्यासाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहन केले.

अहिल्यानगर महानगरपालिका व श्री साई द्वारका सेवा ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने नामदार राधाकृष्ण विखे पाटील ग्रीन सिटी मोहिम राबविण्यात येत आहे. या मोहिमेच्या ट्री बँकेला विखे यांनी भेट दिली. यावेळी उपमहापौर अ‍ॅड. धनंजय जाधव, माजी महापौर बाबासाहेब वाकळे, नगरसेवक निखिल वारे, माजी नगरसेविका सुप्रिया जाधव, ग्रीन आर्मीचे प्रा. हर्षल आगळे, इंजिनिअर कैलास दिघे, प्रताप काळे आदी उपस्थित होते.

यावेळी धनश्री विखे पाटील म्हणाल्या की, उपमहापौर अ‍ॅड. धनंजय जाधव यांच्या संकल्पनेतून सुरू असलेली नामदार राधाकृष्ण विखे पाटील ग्रीन सिटी मोहीम ही पर्यावरणाचे संरक्षण आणि पुढील पिढीच्या उज्ज्वल भविष्यासाठी अत्यंत कौतुकास्पद उपक्रम आहे. उपमहापौर अ‍ॅड. धनंजय जाधव यांनी ग्रीन सिटी मोहिमेच्या माध्यमातून अशी लोकचळवळ उभी केली असून नगरकरांनी सहभागी होत हिरवेगार अहिल्यानगर घडविण्यासाठी योगदान द्यावे.

यावेळी उपमहापौर अ‍ॅड. धनंजय जाधव यांनी धनश्री विखे पाटील यांना ग्रीन सिटी मोहिमेची सविस्तर माहिती दिली. ट्री बँकेमध्ये उपलब्ध असलेल्या विविध देसी वृक्षांचे पर्यावरणीय महत्त्व, त्यांचे संवर्धन, तसेच शहरभर राबविण्यात येणाऱ्या वृक्षारोपण मोहिमेला नागरिकांकडून मिळत असलेला उत्स्फूर्त प्रतिसाद याविषयी त्यांनी माहिती दिली. शहरातील विविध भागांत वृक्षारोपण सुरू असून त्याचबरोबर प्रत्येक वृक्षाचे संगोपन करण्यावरही विशेष भर दिला जात असल्याचे त्यांनी सांगितले.

# सेवा आणि समर्पण हाच रोटरीचा मूलमंत्र

**डॉ. हरिप्रसाद सोमाणी यांचे प्रतिपादन**



रोटरी क्लब ऑफ शेवगाव सिटीचे नूतन अध्यक्ष रो. डॉ. पुरुषोत्तम बिहाणी, सचिव रो. प्रा. गजानन लोंढे आणि खजिनदार रो. अशोक लबडे यांनी पदभार स्वीकारला.

शेवगाव – सेवा, समर्पण आणि नैतिकतेच्या माध्यमातून समाजात सकारात्मक परिवर्तन घडविणे हा रोटरीचा मूलभूत उद्देश असून, सेवा आणि समर्पण म्हणजेच रोटरी, असे प्रतिपादन रोटरी इंटरनॅशनलचे माजी प्रांतपाल डॉ. हरिप्रसाद सोमाणी यांनी केले.

रोटरी क्लब ऑफ शेवगाव सिटीच्या पदग्रहण समारंभात प्रमुख अतिथी म्हणून ते बोलत होते. यावेळी नूतन अध्यक्ष रो. डॉ. पुरुषोत्तम बिहाणी, सचिव रो. प्रा. गजानन लोंढे आणि खजिनदार रो. अशोक लबडे यांनी पदभार स्वीकारला.

डॉ. सोमाणी म्हणाले, सेवा परमो धर्म या तत्त्वावर कार्य करणाऱ्या रोटरीच्या देश–विदेशात २०० हून अधिक शाखा असून सुमारे साडेबारा लाख रोटेरियन समाजसेवेसाठी कार्यरत आहेत. लोभ आणि अहंकाराचा त्याग करून सात्त्विक वृत्तीने समाजसेवेचे व्रत स्वीकारल्यास सर्वांगीण प्रगती साधता येते. एखाद्याला केलेली मदत इतरांना किरकोळ वाटली तरी गरजू व्यक्तीसाठी ती अमूल्य ठरते. त्यामुळे लोक काय म्हणतील याचा विचार न करता समाजसेवेचे कार्य सातत्याने सुरू ठेवणे, हीच रोटरीची खरी ओळख असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी रोटरीचे सहप्रांतपाल रो. डॉ. भागनाथ काटे, मावळते अध्यक्ष रो. युसुफखान पठाण आणि सचिव रो. प्रा. विजय मुधोळकर यांनी गतवर्षातील कामाचा आढावा सादर केला. नूतन अध्यक्ष डॉ. पुरुषोत्तम बिहाणी यांनी नवीन वर्षातील उपक्रमांची माहिती दिली.

कार्यक्रमास शिवाजीराव भुसारी, नगरसेवक सुनील काकडे, नितीन दहीवाळकर, नीरज लांडे, विनोद मोहिते, सागर फडके, खंडूभाऊ बुलबुले, संतोष जाधव, संजय फडके, कचरू सारडा, डॉ. सुभाष बाहेती, कारभारी नजन, संघर्ष योद्धा बबनराव ढाकणे, केदारेश्वर कारखान्याचे उपाध्यक्ष माधव काटे, डॉ. सुयोग बाहेती, डॉ. संजय लड्ढा, डॉ. विकास बेडके, डॉ. मनीषा लड्ढा, सेवानिवृत्त उपप्राचार्य रो. किसनराव माने, डॉ. आशिष लाहोटी, इनरव्हील क्लबच्या नूतन अध्यक्षा रूपाली तडवळकर आणि वसुधा सावरकर आदी उपस्थित होते.

ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते द्वारकानाथ लाहोटी यांनी बसस्थानकावरील पाणपोईच्या नूतनीकरणासाठी रोटरी क्लबला एक लाख रुपयांची मदत जाहीर केली. त्याबद्दल प्रमुख अतिथींच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला.

सूत्रसंचालन माजी प्राचार्य रो. दिलीप फलके यांनी केले. आभार रोटरीचे नूतन सचिव रो. प्रा. गजानन लोंढे यांनी मानले.

# महात्मा जोतीराव फुले द्विजन्मशताब्दी वर्षानिमित्त पशुसंवर्धन विभागाचे राज्यभर विशेष उपक्रम

नगर – महान समाजसुधारक महात्मा जोतीराव फुले यांच्या जयंतीला २०२७ मध्ये २०० वर्षे पूर्ण होत असल्याच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या निर्देशानुसार वर्ष २०२७ हे महात्मा जोतीराव फुले द्विजन्मशताब्दी वर्ष म्हणून साजरे करण्यात येणार आहे. या निमित्ताने राज्यातील पशुपालकांचे उत्पन्न वाढविणे, जनावरांचे आरोग्य सुधारणे आणि दुग्धव्यवसाय अधिक फायदेशीर करण्यासाठी पशुसंवर्धन विभागामार्फत राज्यभर जंतनाशक शिबिरे, वंध्यत्व निवारण शिबिरे तसेच तांत्रिक मार्गदर्शन चर्चासत्रांचे आयोजन करण्यात येणार आहे. या उपक्रमांचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा, असे आवाहन पशुसंवर्धन विभागाचे आयुक्त डॉ. किरण पाटील यांनी केले आहे.

या उपक्रमांतर्गत जुलै ते सप्टेंबर २०२६ या कालावधीत प्रत्येक गावात जंतनाशक शिबिरांचे आयोजन करण्यात येणार आहे. तसेच जुलै २०२६ ते फेब्रुवारी २०२७ या कालावधीत गायी व म्हशींमधील वंध्यत्व निवारणासाठी विशेष तपासणी व उपचार शिबिरे आयोजित केली जाणार आहेत. मार्च ते एप्रिल २०२७ या कालावधीत आधुनिक पशुसंवर्धन विषयक तांत्रिक माहिती आणि मार्गदर्शनासाठी चर्चासत्रांचे आयोजन करण्यात येणार आहे.

# अर्थजगत

घर घेण्याचे स्वप्न पाहताना अनेकदा काही कारणास्तव बुकिंग रद्द करावे लागते. अशा वेळी भरलेल्या जीएसटीचे काय होते, हा प्रश्न अनेक घर खरेदीदारांना पडतो. नियमांनुसार, जर तुम्ही मालमत्तेचे बुकिंग रद्द केले, तर त्यावर भरलेला जीएसटी परत मिळवण्याचा कायदेशीर हक्क तुम्हाला आहे. ही प्रक्रिया समजून घेणे आवश्यक आहे.

## मालमत्ता बुकिंग रद्द केल्यावर जीएसटी परतावा कसा मिळवावा?

गुंतवणूक




गु जेव्हा बिल्डर आणि खरेदीदार यांच्यातील करार रद्द होतो, तेव्हा जीएसटीचे दायित्व संपते. सरकारने यासाठी विशेष मार्गदर्शक सूचना जारी केल्या आहेत. जर तुम्ही बांधकाम सुरू असलेल्या मालमत्तेसाठी जीएसटी भरला असेल आणि नंतर काही कारणास्तव ते बुकिंग रद्द केले, तर बिल्डरने करपात्र पुरवठा रद्द झाल्याचा पुरावा म्हणून 'क्रेडिट नोट' जारी करणे आवश्यक असते. ही क्रेडिट नोट तुम्हाला तुमचा परतावा मिळवून देण्यासाठी मुख्य आधार ठरते.

बिल्डरची भूमिका आणि जबाबदारी

बुकिंग रद्द झाल्यानंतर, बिल्डरने त्यांच्या जीएसटी रिटर्न्समध्ये बदल करणे अपेक्षित असते. त्यांनी भरलेला जीएसटी सरकारकडून परत मागितला जातो किंवा त्याचे समायोजन केले जाते. एकदा बिल्डरने जीएसटी कायद्यांतर्गत योग्य प्रक्रिया पूर्ण केली की, त्यांनी तुमच्याकडून घेतलेली जीएसटीची रक्कम तुम्हाला परत करणे बंधनकारक असते. यादरम्यान, बिल्डरने क्रेडिट नोट जारी केल्याशिवाय तुम्ही जीएसटी परताव्याचा दावा करू शकत नाही.

**खरेदीदारांनी घ्यायची काळजी**

खरेदीदारांनी सर्वप्रथम बिल्डरसोबतचा करार रद्द करण्याचे पत्र कायदेशीररीत्या पूर्ण करावे. बुकिंग रद्द करताना बिल्डरने तुम्हाला जारी केलेली क्रेडिट नोट नीट तपासावी. जर बिल्डर जीएसटी परत देण्यास टाळाटाळ करत असेल, तर तुम्ही संबंधित कर विभागाकडे तक्रार करू शकता. अनेकदा कर परताव्याची प्रक्रिया दीर्घ असू शकते, त्यामुळे सर्व कागदपत्रे आणि व्यवहारांचे पुरावे जपून ठेवणे हितकारक ठरते. प्रत्यक्ष जीएसटी परतावा मिळवण्यासाठी बिल्डरने त्यांची जीएसटी पोर्टलमधील प्रक्रिया पूर्ण केली आहे ना, याची खात्री करून घेणे आवश्यक आहे.




## शेअर बाजारात गुंतवणूक करताना टेक्निकल ॲनालिसिस समजणे गरजेचे?

शेअर बाजार, म्युच्युअल फंड, सोने-चांदी यांमध्ये गुंतवणूक करणाऱ्या अनेकांना आपण 'फंडामेंटल ॲनालिसिस' आणि 'टेक्निकल ॲनालिसिस' शिकलं पाहिजे का, जुजबी माहिती तरी असायलाच हवी का असे प्रश्न पडत असतात.

फंडामेंटल ॲनालिसिस म्हणजे कंपनीचा व्यवसाय, तिचे आर्थिक ताळेबंद, नफा, व्यवस्थापन आणि भविष्यातील वाढीची शक्यता यांचा अभ्यास करणे. दीर्घकालीन गुंतवणुकीसाठी हे अत्यंत महत्त्वाचे असते. याउलट, टेक्निकल ॲनालिसिस म्हणजे शेअरच्या किंमतीचा इतिहास, चार्ट पॅटर्न आणि व्हॉल्यूम यांचा अभ्यास करून भविष्यातील हालचालींचा अंदाज घेणे. हे मुख्यत्वे बाजारातील ट्रेडर्सकडून वापरले जाते.

दीर्घकालीन गुंतवणूकदारांसाठी तांत्रिक विश्लेषण शिकणे अनिवार्य नाही. तुमचे ध्येय ५, १० किंवा २० वर्षांसाठी संपत्ती निर्माण करणे असेल, तर कंपनीच्या व्यवसायाची गुणवत्ता आणि मूल्यमापन समजून घेणे पुरेसे आहे. मात्र, तांत्रिक विश्लेषण शिकल्यास एक मोठा फायदा होतो, तो म्हणजे 'योग्य वेळ'.

तांत्रिक विश्लेषण तुम्हाला बाजारातील चढ-उतार समजून घेण्यास मदत करते. जरी तुम्ही दीर्घकालीन गुंतवणूकदार असलात, तरी चार्ट पाहून तुम्हाला हे समजू शकते की, संबंधित शेअर सध्या ओव्हरबॉट आहे की ओव्हरसोल्ड. यामुळे तुम्ही चुकीच्या किमतीला खरेदी करणे टाळू शकता.

तांत्रिक विश्लेषणामुळे तुम्हाला शेअर खरेदी करण्यासाठी योग्य स्तर आणि नफा बुक करण्यासाठी योग्य स्तर ओळखणे सोपे जाते.

स्टॉप-लॉस वापरून आपले नुकसान मर्यादित कसे ठेवावे, हे शिकण्यासाठी तांत्रिक विश्लेषण प्रभावी ठरते.

सर्वांत महत्त्वाचे म्हणजे बाजार सध्या कोणत्या दिशेने जात आहे, कोणत्या क्षेत्रात खरेदी अधिक होत आहे, विक्रीचा मारा कोणत्या क्षेत्रात होतोय हे केवळ चार्ट पाहून समजते. यामुळे भावनिक निर्णयांवर नियंत्रण मिळवता येते.

थोडक्यात, तांत्रिक विश्लेषण शिकणे हे एक अतिरिक्त कौशल्य आहे. जर तुम्ही एक सक्रिय गुंतवणूकदार असाल, तर फंडामेंटल ॲनालिसिसच्या आधारे काय खरेदी करायचे, हे ठरवा आणि टेक्निकल ॲनालिसिसीच्या आधारे 'कधी खरेदी करायचे' हे निश्चित करा. ही 'हायब्रीड' पद्धत तुमची गुंतवणूक अधिक सुरक्षित आणि फायदेशीर बनवू शकते.




## आयकर विवरणपत्र भरताना....

आयकर विवरणपत्र दाखल करताना करदात्यांकडून अनेकदा छोट्या-मोठ्या चुका होतात आणि त्याचा परिणाम रिफंड मिळण्यास विलंब होतो किंवा आयकर विभागाची नोटीस येऊ शकते. या चुका कोणत्या?

■ चुकीच्या आयटीआर फॉर्मची निवड करणे ही सर्वात मोठी चूक आहे. तुमचे उत्पन्न कोणत्या स्वरूपाचे आहे, त्यानुसार योग्य फॉर्म निवडणे अनिवार्य आहे. चुकीचा फॉर्म भरल्यास विवरणपत्र सदोष मानले जाऊ शकते.

■ रिटर्न भरताना उत्पन्नाची माहिती लपवणे टाळावे. अनेकदा लोक बँकेतील व्याजाचे उत्पन्न, लाभांश, भाडे किंवा फ्रीलान्सिंगमधून मिळणारे अतिरिक्त उत्पन्न दाखवायचे विसरतात. हे उत्पन्न पूर्णपणे घोषित करणे गरजेचे असते.

■ एआयएस आणि फॉर्म २६एएसची पडताळणी करणे अत्यंत महत्त्वाचे आहे. आयटीआरमध्ये भरलेली माहिती आणि या अधिकृत दस्तऐवजांमधील माहिती यात तफावत असल्यास नोटीस येऊ शकते.

■ बँक खात्याची चुकीची माहिती देणे ही एक गंभीर चूक आहे. तुमचा बँक खाते क्रमांक आणि आयएफएससी कोड तंतोतंत असावा. तसेच तुमचे बँक खाते पॅनशी लिंक आणि प्री-व्हॅलिडेटेड असल्याची खात्री करा, अन्यथा रिफंड अडकू शकतो.

■ चुकीच्या करप्रणालीची निवड करणे टाळावे. जुन्या आणि नवीन अशा दोन्ही करप्रणालींचे तुलनात्मक विश्लेषण करून आपल्यासाठी फायदेशीर असलेला पर्याय निवडावा.

■ अपात्र कपातीचा दावा करणे टाळावे. ज्या सवलतींसाठी किंवा कपातीसाठी तुम्ही पात्र नाही, त्यांचा दावा करणे महागात पडू शकते. गुंतवणूक पुराव्यांची योग्य पडताळणी केल्याशिवाय क्लेम करू नये.

■ भांडवली नफ्याची माहिती न देणे किंवा ती चुकीच्या पद्धतीने दाखवणे टाळावे. शेअर बाजार, म्युच्युअल फंड किंवा मालमत्ता विक्रीतून झालेल्या नफ्याची अचूक नोंद करावी.

■ ई-सत्यापन करण्यास विसरू नका. केवळ रिटर्न सबमिट करणे पुरेसे नसते. आयटीआर भरल्यानंतर विहित मुदतीत त्याचे ई-सत्यापन करणे आवश्यक आहे, अन्यथा ते अवैध मानले जाते.

■ वैयक्तिक माहितीमधील चुका टाळाव्यात. पॅन, आधार, नाव, जन्मतारीख आणि संपर्क माहिती अचूक भरावी. जुन्या रेकॉर्डशी ही माहिती जुळत असल्याची खात्री करावी. मुदत संपण्याची वाट पाहू नका. शेवटच्या दिवसांत घाईघाईत फॉर्म भरल्यास चुका होण्याची शक्यता वाढते. त्यामुळे वेळेचे नियोजन करून शांतपणे रिटर्न दाखल करणे केव्हाही चांगले.

## दहा वर्षे पूर्ण होण्याआधी नोकरी सोडल्यास....

कर्मचारी भविष्य निर्वाह निधी (ईपीएफ) आणि कर्मचारी पेन्शन योजना (ईपीएस) नियमांनुसार, नोकरी सोडताना सेवेची १० वर्षे पूर्ण न झाल्यास पेन्शनच्या रकमेचे काय होते, हे समजून घेणे महत्त्वाचे आहे. जेव्हा एखादा कर्मचारी १० वर्षांच्या सेवेचा कालावधी पूर्ण करण्यापूर्वी नोकरी सोडतो, तेव्हा तो 'पेन्शन' मिळण्यास पात्र ठरत नाही. अशा परिस्थितीत कर्मचारी दोन प्रकारे आपली रक्कम हाताळू शकतात.




प्रथम पर्याय म्हणजे कर्मचारी आपली ईपीएस खात्यातील रक्कम काढू शकतो. यासाठी फॉर्म १०-सी चा वापर करावा लागतो. जर तुम्ही १० वर्षांची सेवा पूर्ण केली नसेल, तर तुम्हाला या योजनेतून बाहेर पडून पेन्शन फंडात जमा झालेली रक्कम एकरकमी परत घेता येते. ही रक्कम काढल्यानंतर तुमचे ईपीएस सदस्यत्व संपते आणि भविष्यात पेन्शन मिळण्याचा अधिकारही संपुष्टात येतो. दुसरा पर्याय म्हणजे ईपीएस खात्यातील 'स्कीम सर्टिफिकेट' मिळवणे. जर तुम्हाला भविष्यात पुन्हा नोकरी सुरू करायची असेल आणि पेन्शनचा लाभ घ्यायचा असेल, तर तुम्ही काढलेली रक्कम न काढता स्कीम सर्टिफिकेट घेऊ शकता. हे प्रमाणपत्र तुमच्या सेवा कालावधीचा रेकॉर्ड ठेवते. जेव्हा तुम्ही नवीन नोकरीत रुजू होता, तेव्हा जुन्या सेवा कालावधीची गणना नवीन कालावधीत केली जाते. अशा प्रकारे, १० वर्षांची सेवा पूर्ण करून तुम्ही पेन्शनसाठी पात्र ठरू शकता. महत्त्वाची बाब म्हणजे, जर तुम्ही नोकरी सोडल्यानंतर सहा महिन्यांपेक्षा जास्त काळ बेरोजगार असाल किंवा ईपीएफमध्ये योगदान दिले नसेल, तर तुम्हाला ईपीएसची रक्कम काढण्याचा अधिकार मिळतो. मात्र, जर तुम्हाला सेवानिवृत्तीनंतर पेन्शनची सोय हवी असेल, तर रक्कम काढण्याऐवजी ती पुढील नोकरीशी जोडणे अधिक श्रेयस्कर ठरते. यामुळे निवृत्तीनंतर आर्थिक सुरक्षितता मिळण्यास मदत होते. १० वर्षे सेवा पूर्ण न झाल्यास पेन्शनची रक्कम पेन्शन म्हणून न मिळता ती केवळ 'विथड्रॉल बेनिफिट' म्हणून मिळते, हे लक्षात घेणे गरजेचे आहे.

## रिटर्न भरताना दुय्यम पत्ता देणे बंधनकारक आहे का?

निर्धारण वर्ष २०२६-२७ साठीच्या प्राप्तिकर विवरणपत्रात दुय्यम पत्ता देण्याची अट समाविष्ट करण्यात आली आहे. यामागे प्राप्तिकर विभागाचा मुख्य उद्देश करदात्यांशी असलेला संवाद अधिक सक्षम करणे आणि माहितीची अचूकता वाढवणे हा आहे; पण हा पत्ता देणे सक्तीचे आहे का की पत्ता दिला नाही तरी चालते, याबाबत अनेक करदाते संभ्रमात आहेत.




■ प्राप्तिकर विभागाने दिलेल्या माहितीनुसार, अनेकदा करदाते आपला पत्ता किंवा मोबाईल नंबर बदलतात, परंतु त्याची माहिती विभागाच्या रेकॉर्डमध्ये अद्ययावत नसते. यामुळे विभागाकडून पाठवलेल्या नोटीस किंवा महत्त्वाचे संवाद करदात्यांपर्यंत पोहोचत नाहीत. दुय्यम पत्ता आणि पर्यायी संपर्क माहिती (मोबाईल नंबर, ईमेल) उपलब्ध असल्याने, प्राथमिक माहिती जुनी झाली तरी विभागाला करदात्यांशी संपर्क साधणे सोपे होणार आहे.

■ आजच्या काळात अनेक लोक कामाच्या निमित्ताने मूळ गावाहून दुसऱ्या शहरात किंवा राज्यात स्थलांतरित होतात. अशा वेळी त्यांचे कायमस्वरूपी घर आणि सध्याचे राहण्याचे ठिकाण वेगळे असते. दुय्यम पत्त्यामुळे करदात्याचे दोन्ही ठिकाणचे अस्तित्व नोंदवले जाते, ज्यामुळे प्रशासकीय कामकाजात सुलभता येते.

■ घराभाडे भत्ता किंवा इतर लोकेशन-आधारित कर सवलतींचा दावा करताना अनेकदा विसंगती आढळतात. करदाता ज्या ठिकाणी वास्तव्यासाठी भाडे दाखवतो आणि त्याचा जो अधिकृत पत्ता रेकॉर्डवर आहे, त्यात ताळमेळ बसवण्यासाठी ही दुय्यम पत्त्याची तरतूद मदत करते. यामुळे बनावट भाड्याची पावती सादर करून कर सवलत घेण्याच्या प्रकारांना आळा बसू शकतो.

■ ही तरतूद पूर्णपणे अनिवार्य आहे का, असा प्रश्न पडू शकतो. जर तुमचा प्राथमिक पत्ता आणि सध्याचा पत्ता एकच असेल, तर तुम्ही दोन्ही रकान्यांत तोच पत्ता भरू शकता. मात्र, जर तुम्ही एकापेक्षा जास्त ठिकाणी वास्तव्यास असाल किंवा तुमच्या आर्थिक व्यवहारांसाठी दुसरे ठिकाण अधिक महत्त्वाचे असेल, तर तेथे दुय्यम पत्ता देणे भविष्यातील कायदेशीर अडचणी टाळण्यासाठी योग्य ठरेल.

■ एकूणच, ही माहिती अधिक पारदर्शक आणि अद्ययावत ठेवल्यामुळे प्राप्तिकर विभागाकडून येणारी कोणतीही नोटीस किंवा रिफंडच्या प्रक्रियेत होणारा विलंब टाळता येऊ शकतो. चुकीची किंवा जुनी माहिती देणे टाळावे, कारण यामुळे तुमचे विवरणपत्र छाननीसाठी निवडले जाण्याची शक्यता वाढू शकते.

## 'गोल्ड बॉंड'वरील उत्पन्न रिटर्नमध्ये नोंदवताना...

सार्वभौम सुवर्ण रोखे म्हणजेच सॉव्हेरियन गोल्ड बॉंड हे गुंतवणुकीचे एक सुरक्षित आणि लोकप्रिय माध्यम आहे. मात्र, या गुंतवणुकीवर मिळणारे व्याज आणि विक्रीतून होणारा नफा यांची आयटीआरमध्ये कशी नोंद करावी, याबाबत अनेक करदात्यांमध्ये गोंधळ असतो. प्राप्तिकर नियमांनुसार, या उत्पन्नाची योग्य प्रकारे माहिती देणे आवश्यक आहे, अन्यथा नोटीस येण्याची शक्यता असते.


'एसजीबी'वर मिळणारे व्याज हे करपात्र उत्पन्न मानले जाते. गुंतवणूकदाराला या गुंतवणुकीवर दरवर्षी ठराविक दराने व्याज मिळते. हे व्याज 'इतर स्रोतांकडून उत्पन्न' या सदराखाली दाखवणे अनिवार्य आहे. आयटीआर भरताना 'इन्कम फ्रॉम अदर सोर्स' या विभागात 'इंटरेस्ट' रकान्यामध्ये ही व्याजाची रक्कम नमूद करावी लागते. हे व्याज करदात्याच्या कर स्लॅबनुसार करपात्र असते, त्यामुळे याचा विसर पडू देऊ नये.




■ **भांडवली नफ्याची नोंद कशी करावी? :** जेव्हा तुम्ही एसजीबी रोखे मुदतपूर्तीपूर्वी विकता किंवा मुदतपूर्तीपर्यंत ते स्वतःकडे ठेवता, तेव्हा होणारा नफा 'भांडवली नफा' म्हणून गणला जातो. जर तुम्ही हे रोखे ३ वर्षांपेक्षा जास्त काळ आपल्याकडे ठेवले असतील, तर ते 'दीर्घकालीन भांडवली मालमत्ता' मानले जाते. अशा स्थितीत विक्रीतून मिळणाऱ्या नफ्यावर इंडेक्सेशनचा लाभ घेता येतो. मात्र, जर तुम्ही हे रोखे मुदतपूर्तीपर्यंत (८ वर्षे) स्वतःकडे ठेवले आणि त्यानंतर सरकारकडून त्याचे पैसे मिळाले, तर तो नफा पूर्णपणे करमुक्त असतो.

भांडवली नफ्याची नोंद करताना 'कॅपिटल गेन्स' या विभागात माहिती भरणे गरजेचे असते. विक्रीची किंमत आणि खरेदीची किंमत यांची वजाबाकी करून निव्वळ नफा काढावा लागतो. जर विक्री मुदतपूर्तीपूर्वी झाली असेल, तर त्यावर लागू असलेला दीर्घकालीन भांडवली कर किंवा अल्पकालीन भांडवली कर भरावा लागतो. या सर्व व्यवहारांची माहिती योग्य रकान्यांत भरल्यास भविष्यातील करविषयक गुंतागुंत टाळता येते.

## औद्योगिक धातूंत गुंतवणूक करताय?




जागतिक अर्थव्यवस्थेच्या प्रगतीचे मोजमाप ज्या धातूंवरून केले जाते, त्यात पोलाद (स्टील) आणि तांबे (कॉपर) हे अत्यंत महत्त्वाचे घटक आहेत. पायाभूत सुविधांची निर्मिती असो वा इलेक्ट्रिक वाहनांची क्रांती, या धातूंशिवाय आधुनिक प्रगती अशक्य आहे. शेअर बाजारात आणि कमोडिटी मार्केटमध्ये या धातूंमध्ये गुंतवणूक करणे किंवा ट्रेडिंग करणे हा एक नफ्याचा मार्ग ठरू शकतो, परंतु त्यासाठी बाजारातील बारकावे समजून घेणे आवश्यक आहे.

■ **पोलाद (स्टील) क्षेत्रातील गुंतवणूक**

पोलाद हे विकासाचे प्रतीक मानले जाते. जेव्हा देशात रस्ते, पूल, मेट्रो प्रकल्प आणि मोठ्या गृहनिर्माण प्रकल्पांची कामे वेगाने सुरू असतात, तेव्हा पोलादाची मागणी वाढते. पोलाद कंपन्यांत थेट गुंतवणूक करायची असेल, तर थेट स्टील खरेदी करणे अशक्य असते. त्यामुळे, शेअर बाजारात सूचिबद्ध असलेल्या मोठ्या पोलाद उत्पादक कंपन्यांचे शेअर्स खरेदी करणे हा सर्वोत्तम मार्ग आहे. गुंतवणूक करताना त्या कंपनीची उत्पादन क्षमता, कच्च्या मालाची (लोह खनिज) उपलब्धता आणि जागतिक बाजारपेठेतील पोलादाचे भाव यांचा अभ्यास करणे गरजेचे असते. याशिवाय, सरकारी धोरणे आणि आयातीवरील शुल्काचा पोलाद कंपन्यांच्या नफ्यावर मोठा परिणाम होतो.

■ **तांबे (कॉपर) क्षेत्रातील गुंतवणूक**

तांब्याला 'डॉक्टर कॉपर' असेही म्हटले जाते, कारण तांब्याच्या मागणीवरून जगाच्या आर्थिक आरोग्याचा अंदाज लावला जातो. तांबे हे वीजवाहक असल्याने सौर ऊर्जा आणि इलेक्ट्रिक वाहनांच्या (ईव्ही) निर्मितीत त्याचा वापर मोठ्या प्रमाणावर होतो. तांब्यात व्यापार करण्यासाठी 'मल्टी कमोडिटी एक्सचेंज' (एमसीएक्स) हे महत्त्वाचे व्यासपीठ आहे. येथे गुंतवणूकदार तांब्याच्या फ्युचर्स आणि ऑप्शन्समध्ये व्यापार करू शकतात. तसेच, तांबे काढणाऱ्या किंवा त्यावर प्रक्रिया करणाऱ्या कंपन्यांच्या शेअर्समध्ये गुंतवणूक करणे हा एक सुरक्षित पर्याय ठरू शकतो.

■ **व्यापारासाठी आवश्यक धोरणे**

औद्योगिक धातूंमधील गुंतवणूक ही प्रामुख्याने 'सायकल'वर आधारित असते. आर्थिक मंदीच्या काळात या धातूंची मागणी कमी होते, तर विकासाच्या काळात ती वाढते. त्यामुळे, तांत्रिक विश्लेषणासोबतच मूलभूत (फंडामेंटल) विश्लेषणाला महत्त्व देणे आवश्यक आहे. लक्षात ठेवा, धातूंच्या किमतींत होणारे बदल हे जागतिक घडामोडींशी जोडलेले असतात, त्यामुळे या क्षेत्रातील तज्ज्ञांचे विश्लेषण आणि सततचा अभ्यास हाच यशाचा पाया आहे.

## फ्युचर्स ट्रेडिंग करणार आहात?

शेअर बाजारातील 'फ्युचर्स ट्रेडिंग' हा एक अत्यंत प्रगत आणि तितकाच जोखमीचा प्रकार आहे. नवीन गुंतवणूकदारांनी या क्षेत्रात पाऊल टाकण्यापूर्वी त्याचे पूर्ण स्वरूप समजून घेणे काळाची गरज आहे. सोप्या भाषेत सांगायचे तर, फ्युचर्स ट्रेडिंग म्हणजे भविष्यातील एका ठराविक तारखेला, ठराविक किमतीला कोणतीही मालमत्ता किंवा शेअर खरेदी किंवा विक्री करण्याचा करार होय. यामध्ये आपण प्रत्यक्ष शेअर्स न खरेदी करता, त्या किमतीतील बदलावर सट्टा लावतो किंवा स्वतःच्या पोर्टफोलिओचे रक्षण करतो.

या ट्रेडिंगमध्ये 'लिव्हरेज'ची सुविधा असते, ज्यामुळे कमी भांडवल वापरून तुम्ही मोठ्या रकमेचे व्यवहार करू शकता. हे ऐकायला आकर्षक वाटत असले तरी, हीच गोष्ट नवीन लोकांसाठी सापळा ठरू शकते. कारण, ज्याप्रमाणे नफा अनेक पटींनी वाढू शकतो, त्याचप्रमाणे तोटाही तुमच्या मूळ गुंतवणुकीपेक्षा कितीतरी पटीने जास्त होऊ शकतो. त्यामुळेच या क्षेत्रातील पहिली पायरी म्हणजे, तुमचे ज्ञान वाढवणे. बाजाराचे तांत्रिक विश्लेषण, आर्थिक घडामोडींचा बाजारावर होणारा परिणाम आणि 'मार्जिन' संकल्पना यांची पूर्ण माहिती असल्याशिवाय या वाटेला जाऊ नये.

नवीन गुंतवणूकदारांनी सर्वात आधी एक भक्कम 'ट्रेडिंग प्लॅन' तयार करावा. अनेकजण भावनेच्या भरात, म्हणजे भीती किंवा लोभापोटी निर्णय घेतात. तुमची प्रवेशाची किंमत काय असेल, नफा कुठे बुक करायचा आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे, बाजार तुमच्या विरोधात गेला तर तोटा मर्यादित ठेवण्यासाठी 'स्टॉप-लॉस' कुठे लावायचा, हे व्यापार सुरू करण्यापूर्वीच निश्चित असावे.




स्टॉप-लॉस ही तुमची ढाल आहे, जी तुम्हाला मोठ्या आर्थिक संकटातून वाचवू शकते. कधीही कर्ज काढून किंवा घरखर्चाचे पैसे वापरून फ्युचर्स ट्रेडिंग करू नका. केवळ तेवढीच रक्कम लावा, जी गमावली तरी तुमच्या जीवनमानावर कोणताही विपरीत परिणाम होणार नाही.

फ्युचर्स ट्रेडिंगमध्ये वेळेचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. प्रत्येक कराराला एक एक्सपायरी डेट असते. त्यामुळे तुम्ही घेतलेली स्थिती कायमस्वरूपी ठेवता येत नाही. बाजारातील अस्थिरता लक्षात घेता, एकाच वेळी अनेक मार्केटमध्ये व्यवहार करणे टाळावे. सुरुवातीला एका किंवा दोनच क्षेत्रांवर लक्ष केंद्रित करणे हिताचे ठरते. सातत्याने होणारा नफा पाहून अतिआत्मविश्वास बाळगू नका आणि सातत्याने होणाऱ्या तोट्यामुळे हताश होऊन चुकीचे निर्णय घेऊ नका. बाजार रोज संधी देतो, त्यामुळे संयम राखणे हा या खेळातील महत्त्वाचा गुण आहे.

अनेकदा नवीन ट्रेडर्सना असे वाटते की आपण खूप हुशार आहोत आणि मार्केटचा अंदाज सहज वर्तवू शकतो. पण लक्षात ठेवा, बाजार हा कोणा एकाच्या हातातील बाहुले नाही. माहितीचे स्रोत, तज्ज्ञांचे मार्गदर्शन आणि स्वतःचा अनुभव या तिन्हींचा मेळ घालूनच पुढे जाणे योग्य ठरते. शक्य असल्यास सुरुवातीला सिम्युलेटेड अकाउंट किंवा पेपर ट्रेडिंगच्या माध्यमातून सराव करावा. यामुळे प्रत्यक्ष भांडवल न वापरता तुम्हाला बाजाराचा अनुभव मिळेल.

फ्युचर्स ट्रेडिंग हे विज्ञानासारखे आहे; इथे शिस्तबद्ध अभ्यास आणि जोखीम व्यवस्थापनच तुम्हाला टिकवून ठेवू शकते. त्यामुळे घाई न करता, समजून उमजून आणि पूर्ण तयारीनेच या प्रवासाला सुरुवात करा.

# आचार्यश्रींच्या पुण्य भूमीत भाविकांचा अपूर्व उत्साह आनंददायी

नगर – जैन धर्मातील अतिशय पवित्र असा समर्पण चातुर्मासानिमित्त उपाध्याय प्रवर पूज्य प्रविणऋषीजी म.सा. यांचा २७ जुलै रोजी सकाळी आनंदधामच्या प्रांगणात मंगल प्रवेश झाला. विनायक नगर, बोरा फार्म येथून आनंदधामकडे अत्यंत भव्य, दिव्य व ऐतिहासिक असा मंगल प्रवेश सोहळा झाला. भाविकांच्या अलोट गर्दीत झालेल्या या मंगल प्रवेशाने चातुर्मास काळातील धर्म जागरणाचा शंख निनादला.

पूज्य प्रविणऋषीजी महाराज यांच्या नगरमधील समर्पण चातुर्मासाने महाराष्ट्रासह देशभरातील जैन समाजाचे लक्ष वेधले गेले आहे. उपाध्यायश्रींच्या मंगल प्रवेशाच्या शोभा यात्रेत अर्हम विज्ञा परिवाराच्या १००८ कलशधारी महिला, आगम मंडळाच्या १००८ महिला, विविध युवक मंडळे, युवती मंडळे, महिला मंडळे, अग्रभागी जैन ध्वज घेतलेली मुले तसेच हजारो भाविक सहभागी झाले होते. अर्हम विज्ञा परिवाराच्या प्रशिक्षकांमार्फत चातुर्मासाच्या चार महिन्यांत आयोजित करण्यात येणाऱ्या विविध आध्यात्मिक, सांस्कृतिक, संस्कारवर्धक व व्यक्तिमत्त्व विकास शिबिरांची माहिती देणाऱ्या आकर्षक देखावे , भगवान महावीर, आचार्यश्रींच्या प्रतिमा असलेली सजवलेली वाहने शोभायात्रेचे आकर्षण ठरली. संपूर्ण शोभायात्रा मार्गावर दुतर्फा जैन ध्वजाची झालररूपी सजावट करण्यात आली होती.

शोभायात्रेद्वारे आनंदधाम येथे उभारण्यात आलेल्या 'आनंद तीर्थ समवसरण' येथे उपाध्यायश्रींचे आगमन झाले. यावेळी महाराष्ट्र प्रवर्तक पूज्य कुंदनऋषीजी म.सा., पूज्य आलोकऋषीजी म.सा. , पूज्य तिर्थेशऋषीजी म.सा. , साध्वी पूज्य सत्यप्रभाजी म.सा., साध्वी पूज्य अमितज्योतीजी म.सा. आदींसह साधू साध्वीजी तसेच आ. संग्राम जगताप, राष्ट्रीय पाठशाळेचे अध्यक्ष विद्याधर काकडे, माजी जि.प. सदस्य हर्षदा काकडे, नगरसेवक गणेश भोसले, माजी महापौर भगवान फुलसौंदर, प्रकाश भागानगरे, मर्चंटस बँकेचे चेअरमन संजय चोपडा, समर्पण चातुर्मासाचे मुख्य लाभार्थी अहिल्यानगरचे सुपुत्र, मुंबईचे सुप्रसिद्ध उद्योगपती तसेच तिरुपती बालाजी देवस्थानचे विश्वस्त सौरभ बोरा, सौ. राखी सौरभ बोरा, प्रमिलाबाई बोरा, पराग बोरा व बोरा परिवार, समर्पण चातुर्मास आयोजन कमिटीचे अध्यक्ष अशोक (बाबूशेठ) बोरा, महामंत्री आदेश चंगेडिया, कार्याध्यक्ष राजेश भंडारी, कोषाध्यक्ष विलास कटारिया, उपाध्यक्ष अनिल पोखरणा, राजकुमार बोरा, विजय गुगळे, सुरेश कांकरिया, सचिन देसरडा, मनसुख गुंदेचा, सहसचिव अभय गांधी, अभिजीत गांधी, सहकोषाध्यक्ष विनोद कटारिया, कमिटीचे सर्व सदस्य, धनेश कोठारी, ईश्वर बोरा आदींसह देशभरातील जैन संघटनांचे पदाधिकारी, भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते. स्वागत शोभायात्रेसाठी सकल राजस्थानी युवा मंच एवम महिला मंच, सकल राजस्थानी रायझिंग युथ एवम युवती मंच, जय आनंद महावीर युवक मंडळ, जय आनंद फाऊंडेशन, श्री बडीसाजन ओसवाल युवक संघ यांनी नियोजन व्यवस्था पाहिली.

### पूज्य प्रविणऋषीजी महाराज, समर्पण चातुर्मास २०२६ निमित्त मंगल प्रवेश



समर्पण चातुर्मासानिमित्त उपाध्याय प्रवर पूज्य प्रविणऋषीजी म.सा. यांच्या मंगल प्रवेशावेळी उपस्थित भाविक.

पूज्य प्रविणऋषीजी महाराज यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, आचार्यश्रींच्या पुण्यभूमीत समर्पण चातुर्मासासाठी येणे ही गुरूदेवांचीच कृपा आहे. १७ वर्षांनी आपल्या घरी आलेल्या व्यक्तीला जसे वाटते तशा भावना माझ्या मनात आहेत. मी आज जो काही आहे तो गुरू कृपेमुळे. गुरूदेवांनी माझ्या जीवनाला आकार दिला. त्यांच्या पुण्यभूमीतील भाविकांचा अपूर्व उत्साह पहायला मिळतो. गुरूदेवांच्या शिष्याचा चातुर्मास व्हावा ही पूज्य प्रवर्तकश्रीजी यांचीही इच्छा होती. गुरूबंधूंच्या सान्निध्यात चातुर्मास होत आहे. या चातुर्मासासाठी सौरभ बोरा यांनी सर्व व्यवस्था करण्याची जबाबदारी आग्रहपूर्वक घेतली. त्यांनी व चातुर्मास कमिटीने सर्व नियोजन अतिशय सुंदर आणि भव्य दिव्य केले आहे. कार्यक्रमात प्रारंभी अर्हम विज्ञा ग्रुपच्या महिलांनी स्वागत गीत सादर केले. तीर्थ भक्ती ग्रुपने गुरूवंदना सादर केली. अर्हम विज्ञा आनंदतीर्थ जिनेश्वरी गुरूभक्ती सादर केली. आभार सचिन देसरडा यांनी मानले. मंगल पाठ आणि गुरू वंदना होऊन कार्यक्रमाची सांगता झाली. मंगल प्रवेशापूर्वी बोरा फार्म येथे उपाध्यायश्रीजींच्या सान्निध्यात भव्य सहजोडे भक्तामर अनुष्ठान झाले. यात तब्बल ३ हजार जोड्या सहभागी झाल्या होत्या.

### अर्हम् पुरुषाकार मेडिटेशन (बेसिक) निवासी ध्यान शिबिर


पूज्य उपाध्याय श्री प्रवीणऋषिजी म.सा. यांच्या सान्निध्यात दि. २८ ते ३० जुलै २०२६ रोजी अर्हम् पुरुषाकार मेडिटेशन (बेसिक) ७२ तासांचे निवासी ध्यान शिबिर होणार आहे. यासाठी २७ जुलै रोजी रात्री ८ वाजता प्रवेश देण्यात येईल. कमकुवत, नकारात्मक विचारांनी भरलेले मन कधीही सकारात्मक, समृद्ध आणि आनंदी जीवन देऊ शकत नाही. अर्हम् पुरुषाकारच्या पाच दिव्य शक्तींच्या माध्यमातून आपल्या तन, मन आणि चैतन्याला समृद्ध बनवण्यासाठी शिबरातील मार्गदर्शन उपयुक्त ठरेल. शिबिरासाठी नाव नोंदणीसाठी संपर्क: ९४२२०८४१८५.




समर्पण चातुर्मासाला सुरूवात होताच संपूर्ण अहिल्यानगरचा माहोल बदलला आहे. रसाळ फळ दिसल्यावर तोंडात पाणी येते. तसा माहोल दिसल्यावर आपापसात लढणारेही फळासाठी एकत्र येतात. आषाढी पौर्णिमा हा या फळासारखा दिवस आहे. आप्तस्वकीयांना दुःखी पाहून आपल्या डोळ्यात अश्रू येणे स्वाभाविक आहे. पण शत्रूला दुःखी पाहूनही आपल्या डोळ्यात अश्रू आले पाहिजे. दुसऱ्याला दुःख देणाऱ्याच्या अंतरंगात टॉक्सिन (विष) तयार होते. जसे हे टॉक्सिन वाढत जाईल तसे नरक गतीचा मार्ग खुला होत जातो. आयुष्यात जेव्हा दुसऱ्यांना दुःख द्यायचे बंद करताल तेव्हा तुमच्यातील टॉक्सिन (विष) निघून जाईल. नरक गतीचा मार्ग बंद होईल. आषाढी पौर्णिमेला मानवाची 'मानव' बनण्याची यात्रा सुरू होते. गुरूचे काम असते नादान व्यक्तीला शहाणा करणे. यासाठीच आषाढी पौर्णिमा (गुरु पौर्णिमा) साजरी केली जाते. शास्त्रीय संगीत कार्यक्रमात सुरूवातीला वाद्यांचा ताल, लय यांचा मेळ घातला जातो. त्याप्रमाणे आपल्या घराचा ताल, लय, नाद याचा मेळ बसवला पाहिजे. यासाठी संपूर्ण कुटुंबासह प्रवचनाचा लाभ घेतला पाहिजे. जसे धोबी आपले कपडे स्वच्छ धुवून देतो. तसेच मन स्वच्छ, सुंदर करण्यासाठी आनंद तीर्थ समवसरण नियमित यावे. तुमच्यातील बदल पाहून घरातील इतर सदस्यही तुमच्या बरोबर याठिकाणी मन स्वच्छ करण्यासाठी येतील. बाहेरचा अंधार दूर करण्यासाठी अनेक साधने आहेत. टॉर्च आहे, वीज आहे. परंतु स्वतःच्या अंतर्मनातील अंधकार कसा दूर करायचा? तर हा अंधकार दूर करण्याचे काम धर्म तीर्थ करते. विश्वातील प्रत्येक जीवाला धर्म तीर्थ दिशा देण्याचे काम करते. तीर्थंकर माझ्यावर प्रसन्न व्हावेत ही मनोकामना ठेवावी. श्वेतांबर परंपरेत ४५ आगम आहेत. स्थानकवासी परंपरेत ३२ आगम आहेत. दोन्हींमध्ये एक आगम आहे तो म्हणजे 'आवश्यक आगम'. हा आवश्यक आगम १२० दिवसांत कंठस्थ करणे हे चातुर्मासाचे लक्ष्य आहे. रोज दहा मिनिटे दोन ओळी बोलल्या तरी घरी जाऊन पाठ करायची गरज राहणार नाही. येथेच आवश्यक आगम कंठस्थ होईल. याठिकाणी फक्त घरातील मुख्य पुरुष आणि महिला येणे अपेक्षित नाही तर घरातील पुढची नवी पिढी सुद्धा आली पाहिजे.

**– उपाध्याय प्रवर पू. श्री. प्रविणऋषिजी म. सा.**

# रफींच्या अजरामर गीतांनी रंगणार यादे रफी मैफिल; पंचमदा फॅन्स फौंडेशनतर्फे ३१ जुलै रोजी आयोजन



नगर – स्वरसम्राट स्व. मोहम्मद रफी यांच्या ४६व्या पुण्यतिथीनिमित्त पंचमदा फॅन्स फौंडेशनच्या वतीने ३१ जुलै रोजी यादे रफी या विशेष गीत मैफिलीचे आयोजन करण्यात आले आहे. सावेडी येथील माऊली सभागृहात सायंकाळी ६.३० वाजता होणाऱ्या या मैफिलीत रफी यांच्या अजरामर चित्रपट गीतांचा सुरेल नजराणा रसिकांना अनुभवता येणार आहे.

या मैफिलीत झी सारेगमप फेम गायक रफी हबीब यांच्यासह भाग्यश्री डुंभरे, संदीप भुसे आणि डॉ. सत्तार सय्यद हे मोहम्मद रफी यांच्या लोकप्रिय गीतांचे सादरीकरण करणार आहेत. सूत्रसंचालन फिनिक्स स्किन केअर हॉस्पिटलचे डॉ. राजीव सूर्यवंशी करणार असून, अहिल्यानगर व पुणे येथील कलाकारांचा सहभागही या कार्यक्रमाचे आकर्षण ठरणार आहे.

स्व. मोहम्मद रफी यांनी आपल्या जादुई आवाजाने हिंदी चित्रपटसृष्टीला असंख्य अजरामर गीते दिली. प्रेमगीत, विरहगीत, भक्तिगीत, भावगीत आणि देशभक्तिपर गीतांमधून त्यांनी अनेक पिढ्यांच्या मनावर अधिराज्य गाजविले. त्यांच्या निधनानंतरही त्यांच्या गीतांची लोकप्रियता कायम असून, त्याच स्वरवैभवाला यादे रफी या मैफिलीच्या माध्यमातून संगीतमय मानवंदना अर्पण करण्यात येणार आहे.

पंचमदा फॅन्स फौंडेशन गेल्या १६ वर्षांपासून संगीत आणि कला क्षेत्रातील विविध उपक्रमांच्या माध्यमातून सांस्कृतिक अभिरुची जोपासण्याचे कार्य करत आहे. जुन्या हिंदी चित्रपट गीतांचा वारसा नव्या पिढीपर्यंत पोहोचावा, दर्जेदार संगीताचा आनंद रसिकांना मिळावा आणि सदाबहार गीतांची परंपरा जपली जावी, या उद्देशाने सातत्याने विविध संगीत कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते, अशी माहिती फौंडेशनचे उपाध्यक्ष डॉ. सत्तार सय्यद यांनी दिली.

कार्यक्रमाच्या प्रवेशिका अष्टविनायक मेडिकल, चिंतामणी हॉस्पिटलजवळ, बालिकाश्रम रोड, सावेडी तसेच शांती ऑडिओ, नेता सुभाष चौक, अहिल्यानगर येथे उपलब्ध आहेत. संगीतप्रेमी रसिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या सुरेल मैफिलीचा आस्वाद घ्यावा, असे आवाहन पंचमदा फॅन्स फौंडेशनच्या वतीने करण्यात आले आहे. अधिक माहितीसाठी संदीप भुसे (मो. ९३७१०५५१९२) किंवा डॉ. सत्तार सय्यद (मो. ९८९००५०३०५) यांच्याशी संपर्क साधावा.

# मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त चार हजार महिलांना वाटणार किचन गार्डन किट

नगर – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त भारतीय जनता पार्टी महिला मोर्चाच्या वतीने देवाभाऊ कृषी माऊली सोहळा या विशेष उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या उपक्रमांतर्गत शहरी भागातील ४ हजार महिलांना घरच्या घरी विषमुक्त भाजीपाला पिकविण्यासाठी मोफत किचन गार्डन किटचे वाटप करण्यात येणार असून, आधुनिक सेंद्रिय गृह-कृषीविषयी तज्ज्ञांचे मार्गदर्शनही केले जाणार आहे.

महाराष्ट्र शासनाने महिला शेतकऱ्यांना हक्क आणि सन्मान मिळवून देण्यासाठी राबविलेल्या धोरणांपासून प्रेरणा घेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त हा उपक्रम आयोजित करण्यात आला आहे. भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली आणि भाजप महिला मोर्चाच्या प्रदेशाध्यक्षा आमदार चित्रा वाघ यांच्या संकल्पनेतून या उपक्रमाची अंमलबजावणी होत आहे.

कार्यक्रमात शहरी भागातील मर्यादित जागेत, जसे की बाल्कनी किंवा गच्चीवर, सेंद्रिय पद्धतीने भाजीपाला कसा पिकवावा याविषयी मार्गदर्शन केले जाणार आहे. यासाठी नामांकित नर्सरीचे तज्ज्ञ, हायड्रोपोनिक्स कन्सल्टंट तसेच कृषी विभागाच्या शहरी विभागातील अधिकारी महिलांना आधुनिक गृह-कृषीचे सखोल प्रशिक्षण देणार आहेत.

यावेळी प्रत्येक महिलेला पर्यावरणपूरक कापडी पिशवीत पाच प्रकारच्या भाज्यांचे उच्च दर्जाचे हायब्रीड बियाणे, सेंद्रिय खताची छोटी पिशवी आणि पाणी फवारणीसाठी छोटा स्प्रेअर (कारंजे) असलेले किचन गार्डन किट मोफत वितरित करण्यात येणार आहे.

या सोहळ्यास परिसरातील महिला मोठ्या संख्येने उपस्थित राहणार असल्याची माहिती भाजप महिला मोर्चाच्या जिल्हाध्यक्षा प्रियाताई जानवे यांनी दिली. या कार्यक्रमाला भाजप महिला मोर्चाच्या प्रदेश उपाध्यक्षा तथा जिल्हा प्रभारी गीता गिल्डा यांची प्रमुख उपस्थिती लाभणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

# मतिमंद मुलांच्या निवासी विद्यार्थी वस्तीगृहात मिष्टान्न भोजनाचे वाटप

नगर – समाजातील वंचित, गरजू आणि विशेष गरजा असलेल्या मुलांप्रती सामाजिक बांधिलकी जपत रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (ए) च्या वतीने तपोवन रोड येथील मतिमंद मुलांच्या निवासी विद्यार्थी वस्तीगृहात मिष्टान्न भोजनाचे वाटप करण्यात आले. पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष दीपक निकाळजे यांच्या प्रेरणेने जिल्हाध्यक्ष प्रदीप मकासरे यांच्या पुढाकारातून आयोजित या उपक्रमात विद्यार्थ्यांना प्रेमाने भोजन वाढण्यात आले. त्यांच्याशी मनमोकळा संवाद साधत कार्यकर्त्यांनी काही आनंदाचे क्षण विद्यार्थ्यांसोबत घालवले.

या प्रसंगी शहराध्यक्ष हरिश आल्हाट, युवक शहराध्यक्ष संदीप वाघमारे, संघटक दिनेश पंडित, वांबोरी शहराध्यक्ष आकाश मकासरे, संदीप साळवे, महेश शेलार, प्रदीप शेलार, आकाश महासकरे, विराज महासकरे, रोहित महासकरे तसेच रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (ए) चे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

वस्तीगृहाच्या मुख्याध्यापिका कल्पना भनगडे यांनी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (ए) च्या या सामाजिक उपक्रमाचे कौतुक केले. यावेळी शिक्षिका संपदा केदार, प्रज्ञा गायकवाड, शितल काळोखे, सौम्य केदार, शंकर पाखरे आणि शिवाजी मुंडकर उपस्थित होते.

# अहिल्यानगर सेंट्रल रोटरीचा ३८ वा पदग्रहण सोहळा उत्साहात

### अमर गुरप यांच्याकडे नेतृत्वाची धुरा

नगर – रोटरी क्लब ऑफ अहिल्यानगर सेंट्रलचा ३८ वा पदग्रहण समारंभ सावेडी परिसरातील सेलेस्टिया बँक्वेट्स अँड लॉन्स येथे मोठ्या दिमाखात आणि उत्साहात पार पडला. या भव्य सोहळ्यात मावळते अध्यक्ष रो. सुनील कटारिया यांनी अधिकृतपणे नेतृत्वाची सूत्रे नवीन नवनिर्वाचित अध्यक्ष रो. अमर गुरप यांच्याकडे सुपूर्द केली.



रोटरी क्लब ऑफ अहिल्यानगर सेंट्रलचा ३८ वा पदग्रहण समारंभ सावेडीत पार पडला.

कार्यक्रमाला डिस्ट्रिक्ट गव्हर्नर रो. जयेश पटेल प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते, तर असिस्टंट गव्हर्नर रो. माधव देशमुख हे विशेष अतिथी आणि डिस्ट्रिक्ट फर्स्ट लेडी रो. पारुल पटेल सन्माननीय अतिथी म्हणून लाभले होते. गणेश वंदनेने कार्यक्रमाची सुरुवात झाल्यानंतर मान्यवरांच्या हस्ते प्रतीकात्मक वृक्षाला पाणी घालून रोटरीच्या पर्यावरण संवर्धनाप्रती असलेल्या बांधिलकीचे दर्शन घडविण्यात आले.

या नवीन कार्यकारिणीत रो. सुनील मुथा यांनी सचिव पदाची, तर रो. धीरज मुनोत यांनी खजिनदार पदाची जबाबदारी स्वीकारली. याशिवाय, नवनिर्वाचित संचालक मंडळात उपाध्यक्षपदी रो. मनीष बोरा, संयुक्त सचिव व अध्यक्ष-नियुक्तपदी रो. संजय मुनोत, आयपीपी व सीएसआर संचालकपदी रो. सुनील कटारिया, सर्जंट-ट-आर्म्स म्हणून रो. सतीश कटारिया, तर विविध सेवा प्रकल्पांच्या संचालक पदांवर रो. ईश्वर बोरा, रो. प्रसन्न खाजगीवाले, रो. हरीश नय्यर, रो. चेतन अमरापुरकर, रो. गिरीश मुळे, रो. डॉ. दिलीप बागल, रो. विजय जुंद्रे, रो. डॉ. श्रेया खाजगीवाले, रो. राजीव गुजर, रो. राजेश परदेशी, रो. अजय गांधी, रो. डॉ. कुणाल कोल्हे, रो. हितेश गुप्ता, रो. निलेश मेहेर, रो. अतुल बोरा, रो. दत्ता दीक्षित, रो. उमेश रेखे आणि रो. अभिजीत कोठारी यांची निवड करण्यात आली आहे; तसेच सल्लागार समितीमध्ये पीडीजी रो. शिरीष रायते आणि रो. डॉ. श्रीकृष्ण जोशी यांचा समावेश असून सोहळ्यात सर्व नवनिर्वाचित संचालकांचा सन्मान करत त्यांना रोटरी डायरेक्टर पिन्स प्रदान करण्यात आले.



शहीद स्मारक येथे कारगिल विजय दिवस साजरा करीत शहीद जवानांना अभिवादन करण्यात आले.

# हुतात्मा स्मारकात कारगिल विजय दिवस साजरा

### शहीद जवान अमर रहेच्या घोषणांनी परिसर दणाणला

नगर– कारगिल युद्धातील भारतीय जवानांच्या अद्वितीय शौर्य, पराक्रम आणि सर्वोच्च बलिदानाचे स्मरण करत शहरातील हुतात्मा स्मारक येथे २६ जुलै रोजी कारगिल विजय दिवस अत्यंत देशभक्तीपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. देशभक्तीपर गीतांनी भारावलेल्या वातावरणात भारत माता की जय, वंदे मातरम, शहीद जवान अमर रहे अशा घोषणांनी संपूर्ण परिसर दणाणून गेला. लायन्स क्लब ऑफ अहिल्यानगर यांच्या वतीने आयोजित या कार्यक्रमात नागरिक, सामाजिक कार्यकर्ते आणि युवकांनी मोठ्या उत्साहाने सहभाग घेत शहीद जवानांना श्रध्दांजली वाहिली.

कार्यक्रमाची सुरुवात हुतात्मा स्मारकावर पुष्पचक्र अर्पण करून करण्यात आली. उपस्थित मान्यवरांनी मेणबत्त्या प्रज्वलित करून कारगिल युद्धात मातृभूमीसाठी सर्वोच्च बलिदान देणाऱ्या वीर जवानांना श्रद्धांजली अर्पण केली. देशासाठी प्राणांची आहुती देणाऱ्या सैनिकांचे स्मरण करत उपस्थितांनी काही क्षण मौन पाळून त्यांच्या त्यागाला मानवंदना दिली.

यावेळी लायन्स क्लब ऑफ अहिल्यानगरचे अध्यक्ष हरजितसिंह वधवा, सचिव हरिश हरवानी, खजिनदार विजय कुलकर्णी, डॉ. संजय असनानी, डॉ. मानसी असनानी, प्रशांत मुनोत, सीए किरण भंडारी, सुनिल छाजेड, भावना छाजेड, दिलीप कुलकर्णी, पै. नाना डोंगरे, सम्यक विद्यार्थी आंदोलनाचे विवेक कसबे, गोविंद राजगुरू, प्रतिक ठोकळ, अविनाश साठे, अजित कुऱ्हाडे यांच्यासह लायन्स क्लबचे पदाधिकारी, सदस्य आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

हरजितसिंह वधवा म्हणाले की, कारगिलच्या रणभूमीवर भारतीय जवानांनी दाखविलेला पराक्रम प्रत्येक भारतीयासाठी प्रेरणादायी आहे. देशाच्या सीमांचे रक्षण करताना आपल्या प्राणांची पर्वा न करता त्यांनी दिलेले बलिदान कधीही विसरता कामा नये. प्रत्येक नागरिकाने आणि विशेषतः युवकांनी मनात देशभक्तीची ज्योत तेवत ठेवून देशहितासाठी आपले योगदान देण्याचा संकल्प करावा.

हरिश हरवानी यांनी कारगिल युद्धाचा इतिहास आणि त्याचे महत्त्व उपस्थितांसमोर उलगडून सांगितले. कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने झाली.



मनोहरलाल रामचंद्र सबलोक प्राथमिक विद्यालयात आषाढी एकादशी मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.

# मनोहरलाल सबलोक प्राथमिक विद्यालयात आषाढी एकादशी मोठ्या उत्साहात साजरी

नगर – सेवा शिक्षण प्रसारक मंडळाच्या मनोहरलाल रामचंद्र सबलोक प्राथमिक विद्यालयात नुकतीच आषाढी एकादशी मोठ्या उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात साजरी करण्यात आली. या विशेष कार्यक्रमामुळे संपूर्ण शाळा परिसर विठ्ठलममय आणि वारकरी संप्रदायाच्या रंगात रंगून गेला होता.

या कार्यक्रमाला विद्यालयाच्या मुख्याध्यापिका नराल, शिरसाट, तसेच संस्थेचे सरचिटणीस देशमुख आणि खजिनदार भोईटे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते प्रतिमेचे पूजन करण्यात आले. पाहुण्यांनी विद्यार्थ्यांच्या सादरीकरणाचे आणि त्यांच्या पारंपरिक वेषभूषेचे भरभरून कौतुक केले.

आषाढी एकादशीच्या निमित्ताने विद्यालयातील विद्यार्थ्यांनी वारकऱ्यांच्या पारंपरिक वेशभूषेत उत्साहात सहभाग घेतला होता. या सोहळ्यात विद्यार्थ्यांनी टाळ-मृदंगाच्या गजरात आणि ज्ञानबा-तुकाराम व जय हरी विठ्ठलच्या जयघोषात शाळेच्या परिसरात उत्साहात दिंडी काढली. विद्यार्थ्यांनी सुंदर अभंग आणि भजनांचे गायन केले. तसेच, विद्यार्थ्यांच्या लेझीम पथकाने सादर केलेले संचलन कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण ठरले. छोट्या मुलांनी विठ्ठल आणि रुक्मिणीची आकर्षक वेषभूषा करून सर्वांचे लक्ष वेधले.

या कार्यक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना महाराष्ट्राच्या समृद्ध वारकरी परंपरेची, संत साहित्याची आणि भक्ती संस्कृतीची ओळख झाली. विठ्ठलभक्तीचा संदेश लहान वयातच मुलांच्या मनावर रुजावा, हा यामागील मुख्य उद्देश होता.

# नवीन नेहरू मार्केटला पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर व्यापारी संकुल नामकरणाची मागणी

नगर – महानगरपालिकेमार्फत चितळे रोड येथे नव्याने विकसित होत असलेल्या नेहरू मार्केट (भाजी मंडई व व्यापारी संकुल) या इमारतीस पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर व्यापारी संकुल असे नामकरण करण्यात यावे, तसेच शहरात लागू करण्यात आलेल्या घरपट्टीबाबत राज्यातील ड वर्ग महानगरपालिका क्षेत्रातील घरपट्टीचा अभ्यास करून सुधारित पद्धतीने अंमलबजावणी करण्यात यावी, अशी मागणी नगरसेविका मयुरी जाधव यांनी महापौर ज्योतीताई गाडे यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.



महापौर ज्योतीताई गाडे यांना निवेदन देताना नगरसेविका मयुरी जाधव. समवेत नगरसेवक ॲड. ऋग्वेद गंधे आदी.

निवेदनात जाधव यांनी म्हटले आहे, चितळे रोडवरील नव्याने विकसित होत असलेल्या नेहरू मार्केट (भाजी मंडई व व्यापारी संकुल) या महत्त्वपूर्ण इमारतीस पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर व्यापारी संकुल असे नाव देण्यात यावे. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर या भारतीय इतिहासातील आदर्श, न्यायप्रिय, लोककल्याणकारी आणि दूरदृष्टीच्या राज्यकर्त्या म्हणून संपूर्ण देशात गौरविल्या जातात. त्यांचा जन्म अहिल्यानगर जिल्ह्यातील चौंडी येथे झाला असून त्यांच्या कार्याचा गौरव म्हणून पूर्वीचा अहमदनगर जिल्हा आज अहिल्यानगर या नावाने ओळखला जात आहे. हा जिल्ह्याच्या इतिहासातील अभिमानास्पद आणि महत्त्वपूर्ण टप्पा आहे. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांनी आपल्या कारकिर्दीत मंदिरे, घाट, विहिरी, धर्मशाळा, रस्ते तसेच व्यापारी आणि सामाजिक विकासासाठी अनेक उल्लेखनीय कार्य केले. त्यांच्या लोककल्याणकारी विचारांचा आणि विकासदृष्टीचा वारसा आजही समाजासाठी प्रेरणादायी आहे. त्यामुळे त्यांच्या जन्मभूमीत उभारल्या जाणाऱ्या या महत्त्वपूर्ण व्यापारी संकुलास त्यांचे नाव देणे ही त्यांना खरी आदरांजली ठरेल.

या निर्णयामुळे नव्या पिढीला पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या महान कार्याची ओळख होईल, तसेच अहिल्यानगरच्या ऐतिहासिक, सांस्कृतिक आणि सामाजिक वारशाचे जतन करण्यासही मोठी मदत होईल. त्यामुळे चितळे रोड येथील नव्याने विकसित होत असलेल्या नेहरू मार्केट या इमारतीस पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर व्यापारी संकुल असे नाव देण्याचा ठराव करून त्यास मान्यता द्यावी, अशी मागणी त्यांनी केली आहे.

